पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, जुलै २०२५, खंड २४, अंक ४, पृष्ठे ५८

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक

३ ■ सज्ज
७ ■ 'आर्थिक राष्ट्रवादा'चा चिनी आयाम
१५ ■ 'साधन राष्ट्रवादा'चे हुकुमी हत्यार
२१ ■ सायबर हल्ल्यांचे अनोखे आव्हान
२७ ■ बुडती ही शहरे... पाहवे ना डोळा!

**उजळणी**
३१ ■ भागवत–धर्माची दीक्षा घ्या
३६ ■ ग्रामदान आणि सरकारी मदत

**पुरवणी**
३९ ■ 'नामदेवराय'नामक तत्त्वाचा रोचक परिचय

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/– रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. **त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.
वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : ०२०-२५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेल : ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड २४ (अंक ४)**
**जुलै २०२५**
**संपादक – अभय टिळक**
**सहयोगी संपादक – पराग पोतदार**

- **अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?**
- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

## अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी अनेक माहिती संदर्भासह पुरविणे.**

***अर्थबोधपत्रिका कशी साकारते?***

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याल अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि / किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# सज्ज

आपण सगळेच सध्या युध्यमान परिस्थितीमध्ये आहोत. जगाच्या कोणत्या ना कोणत्या कोपऱ्यात सशस्त्र संघर्ष आणि प्राणहानी सतत चालूच आहे. २०२२ सालातील फेब्रुवारी महिन्यापासून ही युद्धखोरी वैश्विक समुदायाची पाठ सोडायला तयार नाही. रशियाने २४ फेब्रुवारी २०२२ रोजी युक्रेनवर केलेल्या चढाईद्वारे या युद्धपर्वाची नांदी झाली. त्याच्याच पुढच्या वर्षी, म्हणजे, २०२३ साली इस्त्रायलने 'हमास'वरील हल्ल्याच्या निमित्ताने गाझापट्टीमध्ये मारा चालू केला. आणि अगदी गेल्याच महिन्यात प्रथम इस्त्रायलने आणि त्याच्या पाठोपाठ अमेरिकेने इराणच्या अणुप्रकल्पांवर बाँबवर्षाव केला. त्याआधी, पेहलगाममध्ये घडवून आणल्या गेलेल्या हत्याकांडाची परिणती भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमध्ये सशस्त्र संघर्ष पेटण्यात घडून आलेली आपण अनुभवलीच. त्या रक्तरंजित पर्वाची सघनता आणि लांबी–रुंदी, सुदैवाने, फार वाढली नाही म्हणून मिळवले! २०२२ साली उफाळलेला रशिया आणि युक्रेन यांच्यादरम्यानचा संघर्ष आजही धुमसतोच आहे. म्हणजे, हिशेब करायला गेले तर २०२२ सालापासून आज सतत चार वर्षे जगामध्ये लष्करी संघर्ष चालूच आहे. या आकांतामध्ये होरपळलेले जनजीवन पुन्हा कसे व केव्हा सुरळीत होईल, या प्रश्नालादेखील आता काही अर्थ उरलेला नाही. या संघर्षामध्ये गुंतलेल्या देशांच्या केवळ अर्थव्यवस्थाच नव्हे तर, त्या त्या देशांमधील समाजजीवनही या युद्धखोरीपायी पुरते उद्ध्वस्त बनते आहे, याची कणभरही तमा आज कोणालाही दिसत नाही. त्यांमुळे, जगभरातील सगळेच देश कमी–अधिक प्रमाणात, आज, संघर्षसज्जतेमध्ये आहेत अथवा असावेत, असा कयास बांधण्यास कुशल राजनीतीज्ञाची अथवा संरक्षणतज्ज्ञांची गरज नाही. कारण, केव्हा काय घडेल, कोणत्या ठिणगीचे बघता–बघता वणव्यात रूपांतर घडून येईल हे कोणालाच

सांगता येऊ नये, इतकी अस्थिरता आणि अनिश्चितता सर्वत्र दाटलेली आहे. या संघर्षाचे वैशिष्ट्यही मोठे आगळेच आहे. रशिया आणि युक्रेन यांची लढाई समोरासमोर, खुल्या रणांगणावर झडते आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेने केलेले हल्ले आकाशातून केलेल्या बॉम्बवर्षावाचे होते. तर, पेहलगाम रक्तपातानंतर भारत आणि पाकिस्तान यांत उफाळलेला संघर्ष मुख्यत: 'ड्रोन्स'च्या माध्यमातून भडकला. परंतु, अत्याधुनिक तंत्रशास्त्रानेयुक्त अशी युद्धाची आणखी एक आघाडी आज सर्वत्र सक्रिय आहे आणि ती म्हणजे सायबर संघर्षाची. इथे शत्रूच्या संगणकीय आज्ञावलींसारख्या 'सॉफ्ट टार्गेट्स'वर निशाणा साधला जातो. हल्लेखोर अदृश्य असतात. हा हल्ला कसा, केव्हा आणि कोठून होईल याचा काहीदेखील मागमूस लागत नाही. संगणकातील अथवा मोबाइलमधील सगळ्या आज्ञावली एका फटक्यात गारद झाल्यानंतरच हल्ला झाल्याचे ध्यानात येते. संगणकीय आज्ञावलींचा घास घेणारे हे सायबर विषाणूदेखील, हवेतील अन्य विषाणूंसारखे नित्य नव्याने अवतरत राहतात. सायबर विश्वातील ही युद्धे लढली जातात ती मुख्यत: कुजक्या, रोगट, विध्वंसक अशा सडक्या मेंदूच्या


## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

माध्यमातून. हल्ल्याची दिशा अथवा वेळ यांची काहीच अटकळ बांधता येत नसल्याने, अशा सायबर हल्ल्यांना चोख उत्तर देण्यासाठी प्रतिबंधात्मक चिलखते सतत सज्ज राखावी लागतात. या दोहोंखेरीज आता युद्धाची आणखी एक तिसरीच आघाडी उघडली जाताना आपण पाहतो आहोत. 'बाजारपेठ' ही होय या युद्धाची समरभूमी तर शुल्कआकारणी अथवा जिनसांच्या देवाणघेवाणीवरील बंदी ही होत या युद्धामधील अमोघ अशी आयुधे. आघाडीवर लढणाऱ्या फौजेची रसदच एकदा का तोडली की, कितीही धैर्यशील असले तरी हशम हतबलच ठरतात. 'सैन्य पोटावर चालते,' अशी आपली जुनी पारंपरिक म्हण याच वास्तवाचा उच्चार करते. जागतिकीकरणाद्वारे एकत्र गुंफल्या गेलेल्या अर्थकारणात, परस्परांत गुंतलेल्या अर्थव्यवस्थांची नाकेबंदी करण्यासाठी शुल्कास्त्रे उगारली की दाती तृण धरल्यावाचून बाजारातील व्यापारी भागीदारांना अन्य पर्यायच उरत नाही. 'आर्थिक राष्ट्रवादा'चे गेली सुमारे दहा वर्षे आळवत राहिलेले ते सूर आता त्यांना 'साधन राष्ट्रवादा'च्या अंत:स्वरांची जोड लाभल्यामुळे अधिकच तीव्र बनलेले आपण पाहतो आहोत. चीनचे सर्वेसर्वा शी जिनपिंग यांनी त्यांच्या पुंगीतून तेच सूर तीव्रपणे छेडल्यानंतर दात काढलेल्या नागासारखी ट्रम्प यांची झालेली दयनीय स्थिती उभ्या जागतिक समुदायाने अगदी अलीकडेच बघितलेली आहे. परिणामी, देशादेशांमधील व्यापाराचे लाभ उठवत असतानाच, व्यापाराच्या माध्यमातून आपातत: उद्भवणाऱ्या अतिरिक्त परावलंबनापायी आपले स्पर्धक आपली कोंडी करू नयेत यासाठी काही कळीच्या वस्तू व सेवांच्या निर्मितीची क्षमता देशी अर्थव्यवस्थेमध्ये निर्माण करण्याच्या दिशेने अनेक देश त्यांची उत्पादनसज्जता आता बळकट बनवत आहेत. सज्जतेची चौथी आघाडी आजमितीस जगभरात सर्वत्रच उघडली जाते आहे ती, पर्यावरणीय बदलांपायी अवचितच उद्भवणाऱ्या अस्मानी संकटांपासून जीवित आणि मालमत्ता यांचे संरक्षण करण्यासंदर्भातील. अशा या चौफेर सज्जतेचे काही पैलू न्याहाळणारे या अंकातील लेख रोचक वाटतील अशी अपेक्षा आहे.

'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील 'उजळणी' आणि 'पुरवणी' यांचे अंतरंग वैशिष्ट्यपूर्ण जसे आहे तसेच त्या दोहोंत एक आंतरिक अनुबंधदेखील साकारलेला आहे. आषाढी एकादशी आणि महाराष्ट्रातील भागवतधर्मविचाराची ध्वजा पार पंजाबापर्यंत मिरविणारे संत नामदेवमहाराज यांचा ६७५ वा समाधीदिन जुलै महिन्यात यंदा आला. या दोहोंचा थेट संबंध आहे तो भागवतधर्मविचाराशी. भागवतधर्मविचाराने

प्रसृत केलेले भक्तीचे सारतत्त्व वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'भगवद्चिंतन' आणि 'लोकसंग्रह' ही भागवतधर्मप्रणीत भक्तीची दोन अंगे होत. यातील 'नामस्मरण' या अंगाचे भागवतधर्मविचाराला अभिप्रेत असलेले उपयोजन आहे निखळ 'सेक्युलर' (म्हणजे 'इहवादी' अथवा 'लौकिक'). मानवी व्यवहाराचा पोत पुरता नासवून टाकणाऱ्या हिंसा, संघर्ष, स्पर्धा, दुराग्रह यांसारख्या अनिष्ट वृत्ती-प्रवृत्तींचे समूळ उच्चाटण मानवी मनामधून घडवून आणण्याचे साधन म्हणून भागवतधर्मविचार नामचिंतनाचे साधन शिरोधार्य मानतो. तर, अशा नामचिंतनाने ज्यांचे मन शुद्ध बनलेले आहे अशा विवेकी व्यक्तींनी समाजातील सात्विक व सकारात्मक क्रियाशीलता जपणाऱ्या घटकांच्या लोकहितैषी प्रेरणांचे संघटन घडवून आणण्यासाठी स्वतःला वाहून घ्यावयाचे असे प्रतिपादन हे भक्तीतत्व करते. यालाच भागवतधर्म म्हणतो 'लोकसंग्रह'! भागवतधर्माला अभिप्रेत असणाऱ्या 'लोकसंग्रह' या संकल्पनेचे ठोस दर्शन आपल्याला घडते ते संत नामदेवांनी - उत्तर भारतामध्ये सुमारे दोन दशके केलेल्या कार्याद्वारे. उत्तर भारतातील भक्तिसंप्रदायांना प्रेरणा देत स्वभाषा आणि स्व-कर्तव्य यांबाबतचे स्थानिक लोकसमूहांचे भान जागते राखण्यात नामदेवरायांच्या लोकसंग्रहाने दिलेले योगदान म्हणजे पंजाबातील घुमानने आजही जिवंत राखलेली त्यांची स्मृती. प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचे समधात संतुलन साधणारे आणि ज्ञानाधिष्ठित अशा कर्मप्रधान भक्तीचे संस्कार घडविणारे भागवतधर्माचे तत्त्वज्ञान प्रचलीत काळाशी सुसंगत बनवून मांडणारे आचार्य विनोबा भावे यांचे विचारविश्व 'उजळणी'मध्ये सादर केलेले आहे. तर, भागवतधर्मविचारातील लोकसंग्रहाचे मूल्य आपल्या जीवनकार्याद्वारे प्रगट करणाऱ्या नामदेवरायांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय घडविलेला आहे तो 'पुरवणी'मध्ये. १२व्या शतकापासून ते थेट १८-१९व्या शतकापर्यंत संघर्षमय पर्वातून संक्रमण करणाऱ्या मराठी मुलुखातील समाजाभिमुख मानवतेचे संगोपन-संवर्धन याच भागवत धर्मविचाराने सक्रिय राखले. जवळपास तशाच अनवस्थेमधून आजघडीला प्रवास करत असताना भागवतधर्मविचाराचे तेच पाथेय पुन्हा एकवार सकारात्मक जीवनदृष्टीचे संस्कार आजच्या विद्यमान विचारविश्वावर घडविण्यास केवळ उपयुक्तच नव्हे तर उपकारक ठरेल, ही आशावजा अपेक्षा 'उजळणी' आणि 'पुरवणी'चे अंतरंग निश्चित करतेवेळी मनाशी बाळगलेली आहे. नकारात्मक वृत्ती-प्रवृत्तींचे चहूंकडे दाटलेले मळभ हटवायचे तर सकारात्मक अशा सुभग विचारांची उजळण करत राहणे, हा एकच उपाय आपल्या हाताशी उरतो!

# आंतरराष्ट्रीय

## ‘आर्थिक राष्ट्रवादा’चा चिनी आयाम

जागतिकीकरण, उदारीकरण आणि उदारीकरण या तीन संकल्पना ज्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या घटक समजल्या जातात त्या आर्थिक पुनर्रचनेचे वारे जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये साधारणत: १९८०च्या दशकादरम्यान वाहू लागले. निरनिराळ्या देशांनी त्यांच्या त्यांच्या अर्थव्यवस्थांची रचना, अर्थकारणाची तत्कालीन गरज, बाजारपेठा आणि शासनसंस्था हा दोहोंदरम्यान त्या त्या देशात नांदणाऱ्या नात्याचा परंपरागत पोत... अशांसारख्या विविध घटकांचा तोल सांभाळत त्यांच्या त्यांच्या पद्धतीने आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा अंगीकार केला. ही प्रक्रिया पुढील जवळपास दोन ते अडीच दशके अविरत प्रवाही राहिली. परंतु, २००८ साली अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये उद्‌भवलेल्या (आणि नंतर फुटलेल्या) ‘सब्‌प्राइम’ कर्जांच्या फुग्याने वैश्विक अर्थकारणाला जो जबर दणका दिला तेव्हापासून ‘जागतिकीकरण’ या संकल्पनेबाबतच्या आकर्षणाला एकंदरीनेच उतरती कळा लागली. किंबहुना, अमेरिकी ‘सब्‌प्राइम’ कर्जांचा फुगा आणि त्याच्या फुटण्याने जागतिक अर्थकारणाची विस्कटलेली घडी म्हणजे खुल्या बाजारपेठीय अर्थकारणाच्या ‘मॉडेल’ची तळी उचलून धरण्याच्या कार्यपद्धतीची कडवट, अनिष्ट परिणतीच होय अशी हाकाटी आक्रमकपणे उठवण्यास चीनने २०१४–१५ सालापासून सुरुवात केली. देशादेशांमध्ये खुला व सुलभ व्यापार सुरू राहावा याबाबत, साधारणपणे, १९८०च्या दशकापासून प्रवाही बनलेल्या अनुकूल मानसिकतेला २००८ सालातील जागतिक वित्तीय अरिष्टापायी ओहोटी लागली. त्या ओहोटीला अधिकच बळ लाभले ते २०२० सालातील मार्च महिन्यात उद्‌भवलेल्या ‘कोविड १९’च्या महामारीद्वारे. जगभरातील जीवनचक्रच ठप्प होऊन पडल्याने जी अनवस्था निर्माण झाली त्यापायी वैश्विक पुरवठासाखळ्यांची पुरती बरबादी झाली. आपापले अर्थचक्र गतिमान राखण्यासाठी परदेशामध्ये मुळे असलेल्या पुरवठासाखळ्यांवर सर्वतोपरी अवलंबून राहण्यातील

धोका देशोदेशींच्या धोरणकर्त्यांना महामारीच्या त्या दोन वर्षांदरम्यान पुरेपूर उमगला. त्यांमुळे, देशी अर्थकारणाच्या लेखी संवेदनशील अशा काही वस्तू व सेवांची देशांतर्गत निर्मिती शक्य बनविण्याच्या दिशेने स्वदेशी उत्पादनव्यवस्थांचे किमान सक्षमीकरण घडवण्याकडे जवळपास सगळ्यांच देशांचा मोहरा आता वळलेला आहे. म्हणजेच, उदारीकरणासंदर्भातील विचारव्यूहाला काळाच्या ओघात लागलेली कसर, 'कोविड १९'च्या फेऱ्यापायी अधिकच सखोल व सघन बनली.

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमास हात घातल्यापासून, म्हणजे, १९७८-७९ सालापासूनच चीनने निर्यातप्रधान आर्थिक विकासाचे धोरण जाणीवपूर्वक अवलंबले आणि पुढील तीन दशके ते आक्रमकपणे सतत राबवलेदेखील. परकीय थेट भांडवली गुंतवणुकीस लाल पायघड्या घालण्याच्या जोडीनेच, २००३ ते २०१३ अशी जवळपास १० वर्षे अमेरिकी डॉलर्सची गंगाजळी मजबूत करण्यासाठी अमेरिकी डॉलर साठवण्यावर चीनने लक्ष केंद्रित केले. अमेरिकेबरोबरील व्यापाराद्वारे मिळणाऱ्या डॉलर्सच्या जोडीनेच, प्रसंगी, परकीय चलनाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून डॉलर्स खरेदी करण्याचा पर्यायदेखील चीनने त्यासाठी अवलंबला. त्या सगळ्याची परिणती चिनी युआनच्या तुलनेत अमेरिकी डॉलरचे विनिमय मूल्य फुगण्यात घडून आली. अमेरिकी डॉलरच्या तुलनेत युआनचा घडत राहिलेला मूल्यऱ्हास चीनच्या पथ्यावर पडणाराच होता. अमेरिकी बाजारपेठेत चिनी बनावटीच्या चिजा त्यापायी तुलनेने स्वस्त ठरत राहिल्या आणि अमेरिकेबरोबरच्या व्यापारात चीनचे व्यापारी आधिक्य दिवसेंदिवस वाढत राहिले. तशातच, अमेरिकेबरोबरील व्यापाराचे ते समीकरण विस्कटू नये म्हणून अमेरिकी डॉलरबरोबरचे चिनी युआनचे विनिमय मूल्य चीनने कृत्रिमरीत्याच निम्नस्तरावर ठेवण्याचे डावपेचदेखील लढवले. त्यांबद्दल अमेरिकी धोरणकर्त्यांनी जाहीर नापसंतीसुद्धा व्यक्त केली. २०१६ साली डॉनाल्ड ट्रम्प अमेरिकेच्या अध्यक्षस्थानी विराजमान झाले आणि त्यांनी चीनच्या विरोधात उघड आघाडी उघडली. 'अमेरिका फर्स्ट'चा नारा देत ट्रम्प महाशयांनी उग्र अशा 'आर्थिक राष्ट्रवादा'चा पुकारा केला व तशी धोरणे अवलंबण्यास सुरुवातदेखील केली. मग, अमेरिकी बाजारपेठेवरील आपले अवलंबन कमी करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून युरोपीय समुदायातील काही देशांकडे चीनने त्याचा मोहरा वळवला. परंतु, आंतरराष्ट्रीय स्तरावर आताशा चीन सातत्याने अवलंबत असलेल्या विस्तारवादी धोरणापायी साशंक बनलेले पश्चिमी विश्वदेखील सावध पवित्र्यात आता आहे.

अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे २०२४ साली दुसऱ्यांदा हाती घेतल्यानंतर आता तर ट्रम्प अधिकच चढाईखोर भूमिकेत आहेत. अमेरिकी बाजारपेठेत आयात

केल्या जाणाऱ्या चिनी बनावटीच्या जिनसांवर एकतर्फी जबर आयातशुल्क आकारणी करण्याच्या व्यूहरचनेला ट्रम्प यांनी हिरिरीने गती दिली. साहजिकच, चीननेही तितकाच सज्जड प्रतिटोला दिला तो दुर्मीळ खनिज घटकांच्या निर्यातीवरील मूठ आवळण्याद्वारे. चीन आणि अमेरिका यांच्यादरम्यानच्या या व्यापारी युद्धापायी एकंदरच वैश्विक बाजारपेठेची प्रकृती हेळसांडते आहे. जीवनाच्या अनेक अंगांत जरूरीच्या भासणाऱ्या अनेकानेक जिनसांच्या निर्मितीसाठी आवश्यक ठरणाऱ्या दुर्मीळ खनिज घटकांच्या निर्यातीमध्ये खोडा घालण्याच्या चिनी कुरघोडीपायी नाना वस्तूंच्या वैश्विक स्तरावरील पुरवठासाखळ्यांची वीण उसवली जाण्याची आणीबाणी ओढवली. ट्रम्प यांनी आळवलेल्या 'आर्थिक राष्ट्रवादा'च्या रागाला, 'साधनसामग्रीसंलग्न राष्ट्रवादा'चे (रिसोर्स नॅशनॅलिझम) तीव्र सूर आळवत चीनने साग्रसंगीत प्रत्युत्तर दिले. नाक दाबले गेलेल्या अमेरिकेला, अंतिमत:, सामोपचाराच्या तारा निमूटपणे छेडण्याखेरीज गत्यंतरच नव्हते.

या दोन देशांच्या साठमारीपायी जागतिक व्यापाराच्या प्रवाहांमध्ये निर्माण होणारे अडथळे सगळ्यांच देशांच्या आर्थिक हितावर आच आणणारे ठरत आहेत. दुर्मीळ खनिज घटकांच्या जागतिक पुरवठासाखळीचा श्वास कोंडण्याइतपत पकड चीनने त्या क्षेत्रात किती निर्मम धोरणीपणे पद्धतशीररीत्या निर्माण केली आहे, याचा दाहक साक्षात्कार सगळ्या जगाला या सगळ्या घडामोडींद्वारे एकदम घडून आला. अलीकडील काळात जगभरच कमी–अधिक प्रमाणात वाढत असलेल्या 'आर्थिक राष्ट्रवादा'ला चीनने जोडलेला हा नवीनच आयाम, म्हणूनच, नीट समजावून घ्यावयास हवा. दुर्मीळ खनिज घटकांच्या बाजारपेठेतील हा वरचष्मा चीनने एका रात्रीत निर्माण केलेला नाही हे उघडच आहे. ही प्रभुसत्ता प्रस्थापित करण्यासाठी चीनने फार पूर्वीपासूनच जी पावले उचलली त्यांचा मागोवा घेणे केवळ उद्‌बोधकच नव्हे तर कमालीचे रोचक ठरते. रणांगणावरील सामरिक व्यूहरचनेइतकीच व्यापारी युद्धाच्या आघाडीवरील धोरणात्मक व्यूहरचनाही इथून पुढच्या काळात किती व कशी निर्णायक शाबीत होईल, याची चुणूक अलीकडील हा सगळा घटनाक्रम आपल्याला दाखवतो.

दुर्मीळ खनिज घटकांच्या गटात समावेश असणाऱ्या सगळ्यांच खनिजघटकांना येत्या काळात जगभरातूनच वाढती मागणी येईल, अशी सगळी चिन्हे आज दिसत आहेत. जागतिक स्तरावरील एकंदर मानसिकताच आता त्या दिशेने बदलते आहे. वैश्विक स्तरावरील वाढती संघर्षप्रवणता, बळजोर होत चाललेली युद्धखोरी, राष्ट्राराष्ट्रांमधील तीव्र बनत चाललेली शस्त्रास्त्रस्पर्धा, युद्धांचे बदलते रंगरूप, जीवनाच्या जवळपास सगळ्यांच अंगांमध्ये हातपाय पसरणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान, पर्यावरणीय

बदलांच्या फटक्यांपासून वैश्विक समुदायास वाचविण्यासाठी पर्यावरणस्नेही तंत्रज्ञाने विकसित करण्याकडे वेगाने वाढत असलेला कल... अशी अनेकविध कारणे या पालटत्या मानसिकतेच्या मुळाशी आहेत. अतिशय गुंतागुंतीची संरक्षण सामग्री, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, क्षेपणास्त्रे, लढाऊ विमाने, रडार यंत्रणा, पाणबुड्या अशांसारख्या सामरिक साधनांसह 'स्मार्ट' फोनपासून ते विजेवर चालणाऱ्या वाहनांपर्यंत सगळीकडे दुर्मीळ खनिजांचा वापर वाढत्या प्रमाणावर आज केला जातो आहे. विविध प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये वापरले जाणारे 'सेमिकंडक्टर्स', नाना प्रकारच्या बॅटरीज्, पवनचक्क्या, तेल शुद्धीकरणासाठी आवश्यक ठरणारी काही उपकरणे व यंत्रसामग्री यांच्या निर्मितीमध्येदेखील दुर्मीळ खनिज घटकांचा वापर केंद्रवर्ती महत्त्वाचा ठरतो. अशा परिस्थितीत, दुर्मीळ खनिज घटकांचे उत्पादन व पुरवठा यांत चीनने निर्माण केलेल्या एकाधिकारशाहीपायी अनंत आघाड्यांवर अनेक प्रकारची आव्हाने येत्या काळात 'दत्त' म्हणून पुढ्यात उभी राहावीत. खाणजन्य जिनसांच्या उत्पादनात, जागतिक पातळीवर २०२० सालीच चीनचा वाटा जवळपास ५५ टक्क्यांचा होता. तर, परिष्कृत अशा दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनात वैश्विक स्तरावर चीनचा हिस्सा होता तब्बल ८५ टक्क्यांचा. दुर्मीळ खनिज घटकांचे उत्पादन आणि पुरवठा यांच्या आघाडीवर तयार केलेला हा एकाधिकारशाहीचा शिक्का चीन, मोठ्या धोरणीपणे आता, आर्थिक सारीपाटाच्या जागतिक पटावर हुकूमी नाणे म्हणून वापरतो आहे.

आर्थिक क्षेत्रात कमावलेल्या ताकदीचा वापर जागतिक राजकारणामधील आपले स्थान बुलंद बनविण्यासाठी वापरण्याची ही रणनीती अतिशय दूरदृष्टीने गेली सुमारे साडेचार दशके चीन राबवतो आहे. सत्तेच्या वैश्विक पटावरील आपले राजकीय महत्त्व त्याला तितक्याच सबळ आर्थिक आणि सामरिक सामर्थ्याचा भक्कम आधार असेल तरच टिकून राहते, हे चिनी धोरणकर्त्यांनी अचूक ओळखलेले आहे. १९७०चे दशक सरता-सरता चीनने आर्थिक पुनर्रचनेला जो हिरिरीने हात घातला त्या धोरणदृष्टीला राजकीय आणि सामरिक महत्त्वाकांक्षेचे अस्तरही जोडलेले होते. दुर्मीळ खनिज घटकांच्या संदर्भातील धोरणांमध्येही अनुरूप बदल घडवून आणणे चीनला साधून गेले ते १९८०च्या दशकाच्या प्रारंभी अवलंबलेल्या पुनर्रचना कार्यक्रमाद्वारे. दुर्मीळ खनिज घटकांचे साठे कुशीमध्ये सामावलेल्या खाणींचे राष्ट्रीयीकरण घडवून आणावयाचे, अशा खनिजांचे उत्खनन घडवून आणत असताना अवलंबावयाच्या श्रमविषयक तसेच पर्यावरणीय दक्षतांबाबतची मानके बोथट राखायची आणि दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनासाठी अत्यावश्यक असणाऱ्या तंत्रज्ञानाच्या देशी विकासासाठी जोमाने प्रयत्नशील बनावयाचे, अशी त्रिसूत्री त्या धोरणाद्वारे कार्यान्वित केली गेली.

चीनच्या देशी धोरणांचे हात बळकट करणारी अशीच आर्थिक मानसिकता त्या संपूर्ण कालावधीदरम्यान जागतिक स्तरावरदेखील नांदती राहिली. जागतिकीकरणाच्या वाऱ्यांचे स्वागत करण्याची भूमिका सर्वत्र स्थिरावलेली होती. देशी आत्मसन्मान, आर्थिक स्वयंनिर्भरता, बंदिस्त व संकुचित आर्थिक धोरणांचा पाठपुरावा यांची जागा देशोदेशींच्या अर्थव्यवस्थांची अधिकाधिक गुंफण घडवून आणण्यास पूरक अशी धोरणदृष्टी पटकावत होती. निरनिराळ्या वस्तू व सेवांच्या उत्पादनाचे वैश्विक स्तरावरील वितरण व विभाजन निखळ आर्थिक निकषांनुसार घडून येऊन त्याद्वारे विशुद्ध व्यापारी तत्त्वांनुसार निर्धारित होणारी आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी अस्तित्त्वात यावी, असा सर्वसाधारण मानस त्या संपूर्ण पर्वादरम्यान प्रतिष्ठित होता व राहिला. आर्थिक बाबींसंदर्भातील अशा उदार धोरणदृष्टीची पाठराखण करणारी राजकीय मूल्यप्रणालीदेखील देशोदेशींच्या राजकीय व्यवस्थांमध्ये त्या काळात सत्तेची सूत्रे सांभाळत होती. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे देशोदेशींच्या अर्थव्यवस्थांची परस्परांत घट्ट गुंफण घडून आली की राष्ट्राराष्ट्रांमधील सामरिक संघर्ष तसेच चढाओढीलाही आपसूकच आळा बसेल, असाही एक हिशेब त्यामागे होता. आर्थिक हितसंबंध एकमेकांत गुंफलेले असल्यामुळे युद्धखोरपणाला साहजिकच पायबंद निर्माण होईल, हाही दुसरा पदर त्या विचारसरणीला जोडलेला होताच. दुर्मीळ खनिज घटकांच्या पुरवठासाखळ्या आपल्या मुठीत एकवटणे चीनला जमून गेले ते त्याने अवलंबलेल्या देशी आर्थिक धोरणांना जागतिक स्तरावरील खुल्या व्यापारी मानसिकतेच्या प्रवाहांची जोड मिळाल्यामुळेच.

दुर्मीळ खनिज घटकांचे उत्पादन व पुरवठा यांचा वैश्विक नकाशा १९८०च्या दशकापूर्वी पूर्णपणे निराळा होता. त्या प्रांतात त्या काळात वर्चस्व नांदत होते ते अमेरिकेचे. परंतु, १९८०च्या दशकापासून चिनी आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाने वेग पकडल्यानंतर चिनी धोरणकर्त्यांना दुर्मीळ खनिज घटकांचे आर्थिक विकासाच्या संदर्भातील कळीचे महत्त्व चटदिशी जाणवले. माओंच्या सांस्कृतिक क्रांतीचे पर्व उलटून अर्थ-तांत्रिक विकासाच्या युगात प्रवेशत असलेल्या चीनला अत्याधुनिक तंत्रशास्त्रांच्या विकासामध्ये दुर्मीळ खनिज घटकांची असलेली महत्ता एकदम उमगली. त्या बाबतीत निसर्गानेदेखील चीनला हात दिला. चीनच्या Shandon, Sichuan, Fujian and Bayan Obo या चार प्रांतांतील खाणींमध्ये दुर्मीळ खनिज घटकांचे साठे विपुल प्रमाणात पडून होते. या चारांपैकी एकट्या Bayan Obo या प्रांतामध्ये दुर्मीळ खनिज घटकांचे जगातील सर्वाधिक साठे एकवटलेले आहेत. या प्रांतातून

खोदाई झालेल्या दुर्मीळ खनिज घटकांचा, संपूर्ण जगभरातून, दुर्मीळ खनिज घटकांच्या होणाऱ्या एकंदर उत्पादनातील वाटा ४५ टक्क्यांच्या घरात होता. मध्य पूर्वेतील आखाती देशांकडे तेल असेल तर आमच्याकडे दुर्मीळ खनिज घटक आहेत, असे दर्पोक्तीयुक्त ऐलान डेंग झिआओ पिंग करू शकले ते त्यामुळेच!

आर्थिक पुनर्रचना पर्वाच्या पहिल्या टप्प्यात चीनने अंगिकारलेल्या औद्योगिक धोरणाचा यात मोलाचा सहभाग राहिला. दुर्मीळ खनिज घटकांच्या गटातील द्रव्यांची खोदाई व शुद्धीकरण घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारे तंत्रज्ञान विकसित करणे, या उद्योगक्षेत्राच्या वाढीसाठी आवश्यक त्या पायाभूत सेवासुविधा उपलब्ध करून देणे आणि या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कंपन्यांच्या पथ्यावर पडेल अशा प्रकारची किंमतप्रणाली जारी करणे, अशा तरतुदींचा त्या औद्योगिक धोरणामध्ये अंतर्भाव होता. या क्षेत्रात गुंतवणूक जारी राखण्यावर चीनने दिलेला भर आणि दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या अत्याधुनिक तंत्रशास्त्राच्या विकसनावर केंद्रीत केलेला झोत यांमुळे उत्पादनाच्या या प्रांतात प्राविण्य प्राप्त केलेले अन्य देशांतील होतकरू तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ व अभियंते चीनकडे आकर्षित होत राहिले. दुर्मीळ गणल्या जाणाऱ्या खनिजघटकांची खोदाई, त्यांचे विलगीकरण आणि शुद्धीकरण यांत तंत्रशास्त्रीय अव्वलता प्राप्त करून घेण्यावर त्या टप्प्यावर चीनने लक्ष एकवटले. अमेरिकेने १९५०च्या तसेच १९६०च्या दशकामध्ये दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनासंदर्भात ज्या प्रकारची धोरणे राबविलेली होती त्यांचे जणू प्रतिबिंबच चीनने दुर्मीळ खनिज घटकांच्या संदर्भात १९८०च्या दशकामध्ये राबविलेल्या धोरणांमध्ये पडत राहिले. दुर्मीळ खनिज घटकांना जगभरात असलेली मागणी किफायतशीर व स्पर्धात्मक बाजारभावांनी भागवता येईल इतपत क्षमता या सगळ्या भगीरथ प्रयत्नांद्वारे चीनने यथावकाश संपादन करत त्या क्षेत्रातील अमेरिकी वर्चस्वाचा अतिशय पद्धतशीरपणे पुरता ऱ्हास घडवून आणला.

दुर्मीळ खनिज घटकांची खोदाई व शुद्धीकरण साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या उच्च तंत्रशास्त्राच्या देशांतर्गत विकासासाठी सातत्यशील प्रयत्न आणि त्याला पूरक अशी धोरणप्रणाली यांच्या आधारे दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनाचा पाया चीन सतत रुंदावत राहिला. अतिशय मोठ्या प्रमाणावर उत्पादनक्षमता प्रस्थापित केलेली असल्यामुळे दुर्मीळ खनिज घटकांच्या दर एकक उत्पादनखर्चामध्ये बचत घडवून आणणे चीनला शक्य बनत राहिले. परिणामी, दुर्मीळ खनिज घटकांच्या जागतिक बाजारपेठेत, बाजारभावांच्या प्रचलीत सरासरी पातळीपेक्षा कमी दराने

पुरवठा करणे चीनला किफायतशीर ठरत राहिले. साहजिकच, दुर्मीळ खनिज घटकांच्या जागतिक बाजारपेठेतील अन्य स्पर्धक पुरवठादार देशांना चीनबरोबर स्पर्धा करणे अशक्य बनून त्यांनी दुर्मीळ खनिज घटकांच्या बाजारपेठेतून पाय काढता घेतला. दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनामध्ये चीनने आजमितीस निर्माण केलेल्या एकाधिकारशाहीची जडणघडण अशा सगळ्या प्रक्रियेद्वारे क्रमाक्रमाने साकारत आलेली आहे. दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनाच्या या क्षेत्रात पाश्चात्य कंपन्यांना पाय रोवू देण्यास चीन अजिबात राजी नव्हता आणि आजही नाही. दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनात चिनी कंपन्यांचे संयुक्त भागीदार म्हणूनच पाश्चात्य कंपन्या कार्यरत राहतील, याची दक्षता चीन सतत घेत आलेला आहे.

दुर्मीळ खनिज घटकांच्या देशांतर्गत उत्पादनव्यवस्थेवर पोलादी पकड बसवल्यानंतर, त्या संदर्भातील पुढील पावले चीन उचलू लागला १९९०च्या दशकादरम्यान. जगभरातील ज्या देशांमध्ये दुर्मीळ खनिज घटकांचे विपुल साठे दडलेले आहेत त्या साठ्यांची खोदाई व शुद्धीकरण यांत सक्रिय असलेल्या कंपन्यांच्या भागभांडवलात गुंतवणूक करण्याद्वारे त्या त्या देशांतील खाणउद्योगात आपले तांब्याभांडे स्थिर करण्याकडे मग चीन वळला. त्या दृष्टीने अन्य देशांच्या खाणक्षेत्रात सक्रिय असणाऱ्या कंपन्यांचे बहुसंख्य समभाग खरेदी करून त्यांच्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा कावेबाजपणा चिनी धोरणकर्त्यांनी अंगीकारण्यास सुरुवात केली. Magnequech या अमेरिकी खाणक्षेत्रातील एका बलदंड कंपनीतील भांडवलाचा निर्णायक असा मोठा हिस्सा चिनी कंपन्यांनी संयुक्तरीत्या खरेदी करून, दुर्मीळ खनिज घटकांच्या चीनच्या भौगोलिक सीमांबाहेरील साठ्यांवर कबजा करण्यासाठी १९९५ साली चढाई आरंभली. परंतु, चीनचे ते धोरण फार प्रगती करू शकले नाही. दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनामध्ये कार्यरत असलेली आणखी एक अमेरिकी कंपनी आणि ऑस्ट्रेलियातील तशीच एक दुसरी कंपनी घशात घालण्याचे चीनचे प्रयत्न अनुक्रमे २००५ व २००९ साली फसल्यानंतर या मार्गाचा पाठपुरावा करण्याचे चीनने सोडून दिले.

अर्थात, दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनामध्ये एकाधिकारशाही प्रस्थापित करण्याची धोरणदृष्टी नेटाने अवलंबण्यास चीनला काही काळ मोकळा अवकाश मिळाला तोदेखील दुर्मीळ खनिज घटकांची खोदाई व शुद्धीकरण या संदर्भात प्रगत पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये, आणि प्रामुख्याने अमेरिकेत, जी धोरणप्रणाली त्या वेळी राबविली जात होती तिच्यापायीच, ही वस्तुस्थिती नजरेआड करता येत नाही. दुर्मीळ खनिज घटकांची खोदाई, विलगीकरण आणि शुद्धीकरण ही सगळीच प्रक्रिया

एकंदरीनेच अतिशय महागडी जशी आहे त्याचप्रमाणे, दुसरीकडे, या प्रक्रियेचे घडून येणारे पर्यावरणीय परिणामदेखील अपायकारक आणि म्हणूनच अनिष्ट शाबीत होतात. त्यांमुळे, दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनासंदर्भात अमेरिकेमध्ये कठोर मार्गदर्शक तत्त्वे क्रमाने जारी होऊ लागली. अण्वस्त्रांच्या निर्मितीसाठी निकडीच्या भासणाऱ्या उत्पादनघटकांच्या व्याख्येमध्ये अमेरिकी अण्वस्त्र नियामक आयोगाने (यूएस न्यूक्लिअर रेग्युलेटरी कमिशन) तसेच आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेने (इंटरनॅशनल ॲटॉमिक एनर्जी एजन्सी) काही बदल जारी केल्यामुळे दुर्मीळ खनिज घटकांच्या संदर्भात कठोर व काटेकोर अशी परवानेप्रणाली अस्तित्त्वात आणली गेली. त्यांमुळे, दुर्मीळ खनिज घटकांची निर्मिती अमेरिकादी देशांना अधिकच महागडी शाबूत होत राहिली.

अशा परिस्थितीत, दुर्मीळ खनिज घटकांच्या चीनमधून केल्या जाणाऱ्या आयातीस मुक्तद्वार खुले करणे अमेरिकेच्या हिताचेच राहिले. दुर्मीळ खनिज घटकांचे उत्खनन व शुद्धीकरण यांद्वारे निपजणारे संभाव्य असे दुष्परिणाम चीन सोसत राहिला तर, चीनमधून आयात केलेल्या परिष्कृत अशा दुर्मीळ खनिज घटकांपासून नानाविध जिनसा तयार करण्याद्वारे निर्माण होणाऱ्या वाढीव मूल्याचा लाभ अमेरिकी अर्थव्यवस्थेला मिळत राहिला. त्यांमुळे, या व्यवस्थेत अमेरिकेच्या पदरी दुहेरी लाभांचे माप पडत राहिले. अमेरिका खूष आणि चीनही खूष! दुर्मीळ खनिजांचे उत्पादन व पुरवठा या क्षेत्रात एकाधिकारशाही निर्माण करण्यास अमेरिकेचा हातभार चीनला लाभत राहिला तो असा.

एके काळी लाभाचे ठरलेले हे कूळ आजघडीला अमेरिकेच्या व्यापारनिगडित दुखण्याचे मूळ शाबीत होते आहे. दुर्मीळ खनिज घटकांच्या पुरवठासाखळीच्या प्रवाहात अडथळे उभे केले की अमेरिकी शस्त्रसज्जतेचे नाक दाबले जाईल, हे नेमकेपणे हेरून चीन पावले उचलत राहिला. अर्थात, आज सर्वत्र वाहत असलेल्या 'आर्थिक राष्ट्रवादा'च्या प्रवाहांमध्ये, कळीच्या उत्पादनसाधनांशी संलग्न 'साधन-राष्ट्रवादा'चा अंत:प्रवाह जोडून देण्याची खेळी चीन पहिल्यांदाच खेळतो आहे असे नाही. दुर्मीळ खनिज घटकांच्या निर्यातीस क्रमाक्रमाने चाप लावण्याचा पवित्रा चीन चालू शतकाच्या पहिल्या दशकापासूनच अवलंबतो आहे. मुळात, दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनात वैश्विक स्तरावर एकीकडे एकाधिकारशाही निर्माण करत असतानाच, दुसरीकडे, त्या घटकांच्या निर्यातीवरही नियंत्रण राखणे चीनला कशामुळे शक्य बनत आलेले आहे, ते समजावून घेणे उद्बोधक ठरावे.

# आंतरराष्ट्रीय

## ‘साधन राष्ट्रवादा’चे हुकुमी हत्यार

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी उगारलेल्या आयात शुल्कवाढीच्या बडग्याला प्रत्युत्तर म्हणून दुर्मीळ खनिज घटकांचा पुरवठा रोखण्याचे ठेवणीतील अस्त्र उपसण्याचे संकेत ‘ड्रॅगन’ने दिल्यामुळे ‘साधन राष्ट्रवादा’चे हे चिनी हत्यार आताशा पुन्हा एकवार चर्चाविश्वाच्या केंद्रस्थानी आलेले आहे. २००८ साली प्रथम उद्भवलेले जागतिक वित्तीय अरिष्ट आणि २०२१ साली निपजलेला ‘कोरोना’ यांपायी मूळ धरू लागलेल्या ‘आर्थिक राष्ट्रवादा’च्या रोपट्याला चीनप्रणीत ‘साधन राष्ट्रवादा’चा हा नवीनच धुमारा आता अमेरिकी आततायीपणापायी फुटला असावा, असा समज अलीकडील या व्यापार युद्धापायी व्हावा, हे समजण्यासारखे आहे. परंतु, सत्तेच्या जागतिक पटावरील सर्वसामर्थ्यवान महासत्ता म्हणून स्वत:ला प्रस्थापित करण्याच्या ईर्षेने आगेकूच करणाऱ्या चीनने ‘साधन राष्ट्रवादा’चे हे हत्यार १९९०च्या दशकाच्या उत्तरार्धापासूनच पाजळायला सुरुवात केल्याचे नजीकच्या इतिहासावर एक धावती नजर जरी केवळ टाकली तरी ध्यानात येते.

‘साधन राष्ट्रवादा’ला खतपाणी घालण्याच्या आपल्या पवित्र्याचे समर्थन जारी राखण्यासाठी चिनी सत्ताधीश आजवर सतत करत आलेले कथन मोठे मार्मिक होय. जागतिक स्तरावरील एक प्रबळ सत्ता म्हणून आर्थिक, सामरिक आणि राजनैतिक अशा सर्वंच बाबतींत चीनचा गेली सुमारे चार दशके घडून येत असलेला दमदार उदय पाहून पोटशूळ उठलेली पश्चिमी राष्ट्रे, चीनच्या त्या घोडदौडीला लगाम घालण्यासाठी अवलंबत असलेल्या कुटील खेळ्यांना जबाब देण्यासाठी दुर्मीळ खनिज घटकांच्या पुरवठ्यावर निर्बंध आणण्याचा पर्याय अंगीकारावा लागतो, अशी बतावणी चिनी नेतृत्त्व हिरिरीने करते. चीनमधून निर्यात केले जाणारे दुर्मीळ खनिज घटक वापरून अत्याधुनिक तंत्रशास्त्रे व शस्त्रास्त्रप्रणाली तयार करणारे पश्चिमी देश आणि त्यांतही अधिक-करून अमेरिका, तेच सामर्थ्य, चीनने वैश्विक सत्तातोलामध्ये

कमावलेल्या व्यूहरचनात्मक अनुकूलतांचे खच्चीकरण घडवून आणण्यासाठी वापरत आहेत, हे कथन चीन उच्चरवाने करत आलेला आहे. अमेरिकादी पश्चिमी राष्ट्रांच्या त्या मतलबी मनसुब्यांना शह देण्यासाठी दुर्मीळ खनिज घटकांच्या पुरवठासाखळ्या पकडबंद मुठीत आवळणे भाग आहे, ही चिनी मानसिकता या सगळ्या घटनाक्रमाच्या मुळाशी आहे.

निसर्गदत्त साधनसामग्रीच्या विपुल साठ्यांचा वापर वैश्विक पातळीवरील सत्तेच्या साठमारीमध्ये एक हुकूमी सोंगटी म्हणून करण्याचा हा चिनी परिपाठ तसा जुनाच आहे. या अस्त्राचा पहिला प्रयोग चीनने केला तो २०१० साली जपानच्या विरोधात! परंतु, तसे बघायला गेले तर, दुर्मीळ खनिज घटकांच्या पुरवठ्यासंदर्भात चिनी धोरण १९९८ सालापासून बदलाची दिशा क्रमाने अवलंबावयास लागले होते, असे ध्यानात येते. दुर्मीळ खनिज घटकांच्या निर्यातसंलग्न धोरणातील संक्रमणाचे टप्पे आणि जागतिक सत्तातोलातील चीनचे बदलते स्थान या दोहोंत आंतरिक साम्य असल्याचे, तो सारा प्रवास न्याहाळला की ध्यानात येते. ढोबळ मानाने बोलायचे तर १९८५ ते २००३ या कालावधीदरम्यान दुर्मीळ खनिज घटकांच्या निर्यातीस सर्वसाधारणपणे प्रोत्साहन देण्याचेच धोरण चीनने राबविले. अर्थात, निर्यातोन्मुख विकासप्रणाली हा चिनी आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा कणा राहिलेला आहे, ही वस्तुस्थिती ध्यानात घेतली तर, दुर्मीळ खनिज घटकांच्या निर्यातीस प्रथमपासूनच चीन अनुकूल होता याचे नवल वाटू नये. एकंदरीनेच निर्यातीला प्रोत्साहन देण्याचे धोरण जरी एकीकडे राबविले जात होते तरी, दुर्मीळ खनिज घटकांच्या निर्यातीबाबत नियमनात्मक पावले उचलण्यास, दुसरीकडे, चीनने १९९८ सालापासून सुरुवात केली. चीनच्या परराष्ट्र व्यापार व वाणिज्य मंत्रालयाने दुर्मीळ खनिज घटकांच्या निर्यातीमध्ये 'कोटा' निर्धारित करण्याच्या कार्यपद्धतीचा अंगीकार १९९८ साली केला. त्यानंतर तीन वर्षांनी, म्हणजे २००१ सालापासून, दरवर्षी हा 'कोटा' क्रमाक्रमाने कमी कमी करत जाण्याचे धोरण अवलंबले गेले ते २०१० सालापर्यंत. त्याच वेळी, दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनावरील शुल्क वाढविण्यासही चीनने २००६ सालापासून प्रारंभ केला. दुर्मीळ खनिज घटकांच्या निर्यातशुल्कामध्येदेखील वाढ जारी करण्याबरोबरच निर्यातशुल्कांचे जाळेदेखील विस्तारण्यात आले.

दुर्मीळ खनिज घटकांच्या उत्पादनावर तसेच निर्यातीवर शुल्कात एकीकडे वाढ घडवून आणली जात असतानाच, दुसरीकडे, त्यांच्या उत्पादनाबाबत निर्बंधात्मक

मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्याचा पर्यायही चीनने व्यवहारात आणला. दुर्मीळ खनिज घटकांचा समावेश, चीनने मग, ‘संरक्षित सामग्री’ या वर्गात घडवून आणला.

या नवीन व्यवस्थेद्वारे दुर्मीळ खनिज घटकांचे उत्पादन व शुद्धीकरण यांसंदर्भातील नियमने चीनने अधिकच बंदिस्त बनवली. या क्षेत्रामध्ये परकीय गुंतवणुकीला त्यान्वये बंदी घातली गेली. केवळ इतकेच नाही तर, दुर्मीळ खनिज घटकांची खोदाई, प्रक्रिया व शुद्धीकरण यांत गुंतलेल्या चिनी कंपन्यांवरील शासनसंस्थेची पकडदेखील अधिकच आवळण्यात आली. या उद्योगात सक्रिय असणाऱ्या चिनी कंपन्यांच्या कामकाजात तसेच या उद्योगक्षेत्रात अधिक सघन सुसूत्रीकरणाची व्यवस्था नांदावी या दृष्टीने तीन आघाड्यांवर बदल घडवून आणले गेले. पहिले म्हणजे, दुर्मीळ खनिज घटकांच्या निर्मितीमध्ये नवीन कंपन्यांना पाय घालण्यास परवानगी नाकारली जाऊ लागली. ज्या कंपन्या या क्षेत्रात पूर्वीपासून कार्यरत होत्या त्यांनी खाणींमधून दुर्मीळ खनिज घटक काढण्यासाठी किती खोदाई करायची, यांवर कमाल मर्यादा घालण्यात आली. आणि तिसरे म्हणजे, जे चिनी उद्योग या व्यवसायात होते त्यांचे एकत्रीकरण घडवून आणण्यात आले.

दुर्मीळ खनिज घटकांचा आंतरराष्ट्रीय राजनैतिक व्यवहारात हत्यारासारखा वापर करून प्रतिपक्षाला नामोहरम करण्याचा पहिला प्रयोग चीनने २०१० साली केला तो या खनिज घटकांचा जपानला केला जाणारा पुरवठा एका फटक्यात संपूर्णत: बंद करून. त्यासाठी निमित्त ठरला तो, तसे म्हणले तर, एक किरकोळ अपघात. आपल्या देशाच्या सागरी हद्दीचे संरक्षण करण्यासाठी गस्त घालणाऱ्या दोन जपानी नौकांशी मासेमारीसाठी समुद्रात उतरलेल्या एका चिनी ट्रॉलरची धडक झाली ७ सप्टेंबर २०१० या दिवशी. जपानच्या तटरक्षक दलाने, साहजिकच, मच्छिमार ट्रॉलरच्या कप्तानाला मग केली अटक. अटकेत असलेल्या त्या कप्तानाची जपानने सुटका करावी यासाठी चीनकडून जी मोर्चेबांधणी चालू झाली त्यांतील एक उपाय म्हणून दुर्मीळ खनिज घटकांची जपानला केली जाणारी निर्यात चीनने एकदम बंदच करून टाकली! २५ सप्टेंबर २०१४ रोजी त्या कप्तानाची सुटका जपानने केली खरी परंतु, दुर्मीळ खनिज घटकांच्या जपानला केल्या जाणाऱ्या निर्यातीवरील बंदी उठवण्याचे चीन नाव काही घेईना. जपानला केली जाणारी दुर्मीळ खनिज घटकांची निर्यात रोखली की पर्यायाने या खनिज घटकांच्या जागतिक स्तरावरील पुरवठ्यात घट घडून येऊन त्याची परिणती या घटकांच्या बाजारभावांत वाढ होण्यात होईल, हे चीन पुरते जाणून होता. आणि तेच घडवून आणण्याचा चीनचा कावा होता.

'कळीचे उत्पादनघटक' या नात्याने दुर्मीळ खनिज घटकांचा मुबलक प्रमाणावर विनियोग करून निर्माण केलेले तंत्रशास्त्र वापरणाऱ्या जपानी कंपन्यांची चीनने जारी राखलेल्या निर्यातबंदीपायी मग चांगलीच कोंडी झाली.

चीनच्या या व्यापारी चढाईस उत्तर देण्यासाठी, साहजिकच, जपाननेदेखील कंबर कसली. दुर्मीळ खनिज घटकांचा जपानी उद्योगांना केला जाणारा पुरवठा सुरळीत राखण्यासाठी चीनखेरीज अन्य पुरवठादार शोधणे भागच होते. त्यांतच, दुर्मीळ खनिज घटकांच्या बाजारपेठेत मागणीच्या तुलनेत पुरवठा तोकडा पडल्यामुळे चांगल्यापैकी दरवाढ घडून आलेली होती. परिणामी, चढ्या बाजारभावाने दुर्मीळ खनिज घटक पदरात पाडून घेण्याखेरीज जपानला गत्यंतरच नव्हते. चीनखेरीज अन्य देशांकडून दुर्मीळ खनिज घटकांची खरेदी चढ्या बाजारभावांनी करण्यासाठी जपानी सरकारने मग अर्थसंकल्पात वाढीव अर्थपुरवठ्याची तरतूद केली. अमेरिकेशी संधान बांधून जागतिक व्यापार संघटनेच्या व्यासपीठावर चीनच्या विरोधात जपानने फिर्याद नोंदविली. देशोदेशींच्या खुल्या व्यापारासंदर्भात जागतिक व्यापार संघटनेने लागू केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा, जपानच्या विरोधात चीनने उचललेल्या निर्यातबंदीच्या हत्याराद्वारे, सरासर भंग झालेला आहे असा निकाल जागतिक व्यापार केंद्राच्या संबंधित लवादाने २०१४ साली दिला. अखेर, दुर्मीळ खनिज घटकांच्या निर्यातीबाबत सुरू केलेली 'कोटा' पद्धत आणि या खनिज घटकांच्या जपानला केल्या जाणाऱ्या निर्यातीवर जारी केलेली बंदी चीनने २०१५ साली मागे घेतली. निर्यातबंदीचे हे हत्यार चीन पुन्हा केव्हाही उपसू शकेल, याची अटकळ बांधून दीर्घकालीन पर्यायी उपाययोजना निर्माण करण्याच्या दृष्टीने दुर्मीळ खनिज घटकांचा फारसा वापर न करणारी तंत्रशास्त्रे विकसित करण्याकडे जपानी उद्योगांनी व संशोधनव्यवस्थांनी त्यांचा सारा झोत मग स्थिर केला. महत्त्वाची कच्ची सामग्री म्हणून दुर्मीळ खनिज घटकांचा वापर ज्या तंत्रज्ञानांमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असे तिथे त्या खनिज घटकांच्याऐवजी अन्य काही कच्चा माल पर्याय म्हणून वापरता येतो का, यांबाबत प्रयोग करण्यावर जपानी उद्योगांनी लक्ष केंद्रीत केले. चीन आणि जपान या दोहोंदरम्यान झडलेल्या त्या व्यापारी युद्धामुळे जगभरातील अन्य देशही स्वाभाविकपणेच सावध झाले. दुर्मीळ खनिज घटकांचे चीनखेरीज अन्य पुरवठास्रोत विकसित करण्याकडे जगभरातच तेव्हापासून प्रयत्नांचा झोत वळविण्यात आला.

जपानची कोंडी करण्यासाठी चीनने उपसलेले 'साधन राष्ट्रवादा'चे हत्यार व्यवहारात कितपत प्रभावी ठरते, हादेखील एक चिकित्सेचाच विषय बनतो. मुळात, ट्रम्प

यांच्या शुल्कवाढीच्या खेळीला शह देण्यासाठी चीनने 'साधन राष्ट्रवादा'चे हत्यार पुन्हा एकवार उपसण्याचे संकेत जाहीर केल्यानंतर, दुर्मीळ खनिज घटकांच्या आयातीवर अवलंबून असलेले जगभरातील अन्य देश एकदम सावध बनले. चिनी कावेबाजपणाचा मुकाबला करण्यासाठी प्रत्येक देशाने त्याच्या त्याच्या पातळीवर लगोलग पावले उचलायला सुरुवातही केली, हा झाला यांतील पहिला भाग. दुसरे म्हणजे, दीड दशकापूर्वी, २०१० साली जपानच्या विरोधात उगारलेले 'साधन राष्ट्रवादा'चे ते हत्यार त्या वेळी तरी व्यवहारात कितपत प्रभावी ठरले होते, हासुद्धा एक तसा काहीसा शंकास्पदच मुद्दाच ठरतो. कारण, दुर्मीळ खनिज घटकांच्या जपानला केल्या जाणाऱ्या निर्यातीवर बंदी जारी केल्यानंतर खुद्द चीनमध्येच त्याची जी प्रतिक्रिया उमटली ती मोठी मजेशीर होतीच व तितकीच ती अभ्यसनीयही ठरते.

कोणत्याही वस्तू अगर सेवेच्या आयात-निर्यातीवर पाबंदी जारी केल्यानंतर जे होते तेच सगळे चीनमध्ये त्या काळात घडले. पहिले म्हणजे, दुर्मीळ खनिजांचे उत्पादन आणि/किंवा निर्यात यांत सक्रिय असणाऱ्या चिनी कंपन्यांनी निर्यातबंदीचे हत्यार व्यवहारात सपशेल निष्फळ ठरविणारा हुकूमी पर्याय अवलंबला तो म्हणजे छुप्या निर्यातीचा! कस्टम्सच्या कचाट्यातून सुटण्यासाठी दुर्मीळ खनिज घटकांना अन्य जिनसांची नावे बहाल करून ती तपासणीमधून सोडवून घ्यायची व नंतर त्यांची खुलेआम विक्री करण्याचा परिपाठ चिनी निर्यातदारांनी अवलंबला. निर्यात केले जाणारे पदार्थ हे दुर्मीळ खनिज घटक नसून अन्य काही तरी वस्तुजात असल्याची बतावणी करत कस्टम्सच्या व्यवस्थेतील अधिकाऱ्यांची तपासणीदरम्यान सरळ सरळ दिशाभूल केली जात असे. दुसरे म्हणजे, चिनी शासनसंस्थेने दुर्मीळ खनिज घटकांची जपानला होणारी निर्यात रोखल्यानंतर या खनिज घटकांच्या वैश्विक बाजारपेठेतच मागणी आणि पुरवठ्याचे समीकरण एकंदरीने विस्कळीत बनून त्याची परिणती बाजारभाव भडकण्यात घडून आली. साहजिकच, दुर्मीळ खनिज घटकांच्या काळ्या बाजाराने एकदम उचल खाल्ली. दुर्मीळ खनिज घटकांच्या चढलेल्या बाजारभावांपायी छुपी निर्यात, काळा बाजार निर्यातदारांच्या पथ्यावरच पडले. त्यांमुळे, जपानला नमवण्यासाठी दुर्मीळ खनिज घटकांची निर्यात रोखण्याचे चिनी पाऊल प्रत्यक्षात किती परिणामकारक शाबीत झाले, हा प्रश्नच आहे.

चीन आणि जपानदरम्यानच्या त्या व्यापारी युद्धापायी उद्‌भवलेल्या व्यापारी परिस्थितीला त्या वेळी निर्माण झालेली ती तात्कालिक प्रतिक्रिया होती असे जरी एकवेळ मानले तरी, निर्यातबंदीचे हे हत्यार सतत उगारते राखणे अथवा वेळोवेळी

उपसत बसणे चीनला तरी व्यवहारत: खरोखर कितपत परवडणारे आहे, असा प्रश्नही अभ्यासकांकडून उपस्थित केला जातो. कारण, मुदलात चिनी आर्थिक विकासाचे सारे प्रारूपच निर्यातप्रधान असे राहिलेले आहे. दुसरे म्हणजे, गेल्या सुमारे तीन ते साडेतीन दशकांच्या कालावधीदरम्यान चीनने जागतिक स्तरावर जी राजनैतिक पावले उचललेली आहेत आणि वेळोवेळी जे पवित्रे प्रगट केलेले आहेत त्यांमुळे वैश्विक समुदायात एकंदरीनेच चीनबाबत प्रचंड संशयाची भावना बद्धमूळ झालेली आहे. वाढत्या आर्थिक सामर्थ्याच्या जोडीनेच आपली सामरिक ताकद वाढवण्यावर चीन सतत देत आलेला भर आणि या दोहोंच्या पायावर वैश्विक सत्तातोलात सर्वोच्च पद पटकवण्याचे चिनी स्वप्न उभ्या जगाने आज हेरलेले आहे. त्यांमुळे, एकंदरीनेच चीनबद्दल व्यापक स्तरावर अविश्वासाचे वातावरण नांदू लागलेले जाणवते व दिसतेही. त्यांमुळे, भविष्यातील सगळा तंत्रविकास मुख्यत: दुर्मीळ खनिज घटकांच्या सुरळीत पुरवठ्यावर निर्भर असणार आहे, हे गमक उमजलेले सगळेच देश आता त्या खनिज घटकांच्या पुरवठ्याबाबत आजतागायत चीनवर असलेले आपले अवलंबन घटवण्यासाठी जारीने प्रयत्नांना लागलेले आहेत.

या सगळ्याचा व्यापारी तोटा उद्या चीनलाच सोसावा लागेल. ‘साधन राष्ट्रवादा’च्या चिनी हत्यारापासून स्वत:चे रक्षण करण्यासाठी जगभरात जी मोर्चेबांधणी होईल त्यांपायी, येत्या काळात, दुर्मीळ खनिज घटकांचे चीनखेरीज अन्य पर्यायी पुरवठास्त्रोत बळकट करण्यावर भर दिला जाईल, हे पहिले. दुसरे म्हणजे, दुर्मीळ खनिज घटकांऐवजी अन्य उत्पादनघटकांच्या विकासावर भर दिला जाईल. तिसरे म्हणजे, आपापल्या देशामध्ये जारी असलेल्या पर्यावरणसंरक्षक मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत ठरतील अशा प्रकारची तंत्रविज्ञाने विकसित करून दुर्मीळ खनिज घटकांचे विलगीकरण आणि शुद्धीकरण साध्य करण्याचे प्रयत्न जगभरातील सगळे देश जारीने हाती घेतील. या सगळ्यांमुळे, उद्या दुर्मीळ खनिज घटकांच्या बाजारभावांत घट सुरू झाली तर ते चीनलाच परवडणारे नाही. आजच चिनी विकासाची घोडदौड मंदावलेली आहे. तशात, दुर्मीळ खनिज घटकांच्या पुरवठासाखळ्या आवळण्याचे धोरण राबवत ‘साधन राष्ट्रवादा’चे सूर चीन आळवतच राहिला तर ते, स्वत:च्या हाताने पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे ठरेल, असा आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या अभ्यासकांचा होरा सांगतो.

## तंत्रज्ञान

# सायबर हल्ल्यांचे अनोखे आव्हान

आधुनिक काळामध्ये आता युद्धाचे स्वरूप झपाट्याने बदलत चालले आहे. हे वास्तव लक्षात घेऊनच विविध देशांना त्यांची रणनीती आखावी लागते आहे. पूर्वी युद्ध म्हटले की, ते सीमेवर लढले जायचे. परंतु, आता मात्र वेगळ्या पद्धतीने युद्धे लढली जाऊ लागल्याचे दिसू लागले आहे. त्यातील काही हल्ले तर असे आहेत ज्यामध्ये प्रत्यक्षात बाँब किंवा क्षेपणास्त्रांचा मारा न करता, सीमेवर सैन्यांमध्ये समोरासमोर लढाई न झडता आणि अण्वस्त्रांचा वापर न करतादेखील प्रतिस्पर्धी राष्ट्राला जेरीस आणता येऊ शकते. त्या नव्या आयुधाचे नाव आहे 'सायबर हल्ले'. सायबर हल्ले करणाऱ्या 'हॅकर्स'चा गट संबंधित देशाच्या व्यवस्थेवर आणि विविध यंत्रणांवर चढाई करून तीच ठप्प करण्याचा अथवा आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करतो. शत्रूराष्ट्राला अशा हल्ल्यांनी नाक घासणे भाग पडावे इतकी ताकद या आधुनिक युद्धनीतीमध्ये निश्चितपणे आहे.

या संदर्भातील अगदी ताजे उदाहरण द्यायचे झाले तर भारतावर नुकत्याच झालेल्या पेहलगाम हल्ल्याचे देता येऊ शकेल. दहशतवाद्यांनी पेहेलगाममध्ये हल्ला केल्यानंतर पाकिस्तानसह विविध देशांतून भारतावर सायबर हल्ले सुरू झाले. भारताच्या व्यवस्थेवर अवघ्या काही दिवसांत १० लाखांहून अधिक सायबर हल्ले झाल्याचे दिसून आले होते. प्रामुख्याने भारतातील महत्त्वाची अधिकृत संकेतस्थळे आणि 'वेबपोर्टल्स' यांना लक्ष्य करण्यात आले होते. पाकिस्तान, मध्य-पूर्वेतील काही देश, मोरोक्को आणि इंडोनेशिया येथून हे सायबर हल्ले करण्यात आले होते. त्या नंतर काही दिवसांनी भारत-पाकिस्तान या दोन देशांत शस्त्रसंधी झालेली असली तरीही भारतात दररोज ३० ते ४० सायबर हल्ले मात्र सुरूच असल्याचा या क्षेत्रातील अभ्यासकांचा दावा आहे. त्यामुळे दोन देशांच्या सीमांवर शांतता आहे असे चित्र दिसत असले तरी देशांतर्गत व्यवस्थांवर आणि यंत्रणांवरचे हे छुपे हल्ले मात्र सुरूच

राहतात आणि ते कोणत्याही देशासाठी अधिक धोकादायक ठरू शकतात. त्याच्या जोडीला आता आलेल्या नव्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (आर्टिफिशिअल इन्टलिजन्स–एआय) तंत्रज्ञानामुळे तर येणाऱ्या काळात हे सायबर हल्ल्यांचे आव्हान अधिक सघन होत जाणार असल्याचा अंदाज सायबर तज्ज्ञांकडून व्यक्त केला जातो आहे.

सायबर युद्ध हे आधुनिक काळात राष्ट्रीय सुरक्षिततेसमोरील सर्वांत मोठ्या आव्हानांपैकी एक आहे. एकीकडे अंकीय (डिजिटल) क्रांतीमुळे जगभरातील देश माहिती–तंत्रज्ञानाच्या नव्या वापरांवर अवलंबून राहू लागलेले आहेत आणि दुसरीकडे अशा सायबर हल्ल्यांचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. एका चांगल्या दिशेने आर्थिक प्रगती करणाऱ्या देशांसाठी तर हे अधिकच मोठे आव्हान ठरते. कारण आर्थिक नुकसान घडवून आणणे, संवेदनशील माहितीची चोरी करणे, सरकारी कामकाजात व्यत्यय आणणे व राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण होईल अशा गोष्टी करणे या हेतूने सायबर हल्ले केले जातात. अगदी गेल्या काही वर्षांतील आढावा घेतला तरी भारतामध्ये २५ हून मोठे सायबर हल्ले झालेले आहेत. भारत पे (२०२२), 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस्' – 'एम्स'वरील सायबर हल्ला (२०२२), पोलीस डेटावर केलेला हल्ला (२०२३), तेलंगणा पोलिस डेटा हॅक (२०२३), नॅशनल डिझास्टर मॅनेजमेंट (२०२३), इंडियन एनर्जी सेक्टर (२०२४) ही त्यातील काही प्रमुख उदाहरणे आहेत. असे सायबर हल्ले परतावून लावण्यासाठीची संरक्षणात्मक यंत्रणा किती मजबूत आहे हे अशा प्रसंगी महत्त्वाचे ठरते. अनेकदा सुरक्षा यंत्रणेतील त्रुटीसुद्धा अशा हल्ल्यांमध्ये उघड होत असतात. या सगळ्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रीय सायबर सुरक्षा धोरण प्रत्येक देशासाठी महत्त्वाचे बनलेले आहे. संरक्षण व्यवस्थेमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे आणि कोणत्याही प्रकारच्या सायबर हल्ल्यांना तोंड देऊन ते परतवता येतील अशी सक्षमता व्यवस्थांमध्ये निर्माण करणे यावर आता प्रामुख्याने भर दिला जातो आहे.

सद्य:स्थितीमध्ये विविध स्तरांवर अंकीय सुविधांचा अंगीकार मोठ्या प्रमाणावर केला जातो आहे. सरकारी व खासगी कंपन्या, उद्योगजगत, सरकारी यंत्रणा, बँका व वित्तीय संस्था, लष्करी आयुधे निर्मिती आणि लष्करी प्रशिक्षण या बाबींमध्येही अंकीय तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य झालेला आहे. पूर्वी ज्या सगळ्या गोष्टी कागदोपत्री होत असत त्या आता प्रामुख्याने 'ऑनलाईन' आणि अंकीय स्वरूपात होत आहेत. त्यामुळे अशा अंकीय व्यवस्थेवर आघात करणे आणि तिच्यावर वर्चस्व मिळवणे हा सायबर हल्ल्यांचा प्रमुख हेतू असतो. सायबर हल्ल्यांमध्ये सर्वांत अधिक धोका

असतो तो मोठे आर्थिक नुकसान होण्याचा. त्यासाठी अनेकदा हे हल्ले केले जातात आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर सखोल आणि सघन असे अनिष्ट परिणाम घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो.

अलीकडच्या काळातील आकडेवारी पाहिली तरी या धोक्याचे स्वरूप जागतिक पातळीवर किती गंभीर होत चालले आहे हे आपल्या लक्षात येते. २०२३ या एका वर्षातील आकडेवारी जरी वानगीदाखल पाहिली तरी त्याची व्यापकता लक्षात येऊ शकेल. या एका वर्षात जगभरात ज्या कंपन्यांवर सायबर हल्ले झाले त्यात त्यांचे तब्बल ८ लाख कोटी डॉलर्सचे नुकसान झालेले आहे. येत्या अवघ्या पाच वर्षांत सायबर हल्ल्यांचे प्रमाण अधिकच वाढणार असून हे नुकसान २४ लाख कोटी डॉलर्सवर पोहोचू शकेल, असा संभाव्य धोका सायबर तज्ज्ञांकडून व्यक्त केला जातो आहे. त्यामुळे असे आर्थिक धक्के घडू नयेत यासाठी तातडीच्या उपाययोजना राबवणे गरजेचे झालेले आहे. सायबर सुरक्षा प्रणाली सक्षम असणे आणि सायबर हल्ले परतवण्यासाठी तशी प्रभावी रणनीती सुसज्ज असणे ही आजच्या काळाची गरज बनलेली आहे.

**लहान व मध्यम कंपन्यांवरही हल्ले**

सायबर हल्ले हे केवळ मोठ्या आणि जागतिक स्तरावर सक्रिय असणाऱ्या कंपन्यांवरच केले जातात असा एक सर्वसाधारण समज असतो. परंतु अलीकडच्या काळात देशांतर्गत आणि देशाबाहेरून होणाऱ्या सायबर हल्ल्यांमध्ये छोट्या आणि मध्यम आकाराच्या व्यवसायांनाही लक्ष्य केले जात असल्याचे लक्षात आले आहे. अशा कंपन्यांवर सायबर हल्ले करणे आणि आपले हेतू साध्य करणे 'हॅकर्स'ना तुलनेने अधिक सोपे जाते. अशा लघु व मध्यम आकाराच्या कंपन्यांच्या अंकीय सुरक्षाप्रणाली तितक्याशा प्रभावी नसल्याने त्यांना खिंडार पाडून त्यांच्यावर सायबर हल्ले करणे तुलनेने सोपे ठरते. त्यामुळे अलीकडच्या काळात अशा कंपन्यांवरील हल्ले लक्षणीयरीत्या वाढलेले आहेत. लहान व्यवसायांचा जीव तोळामासा असल्याने त्यांच्यावर झालेला सायबर हल्ला त्यांचे अस्तित्व संपवण्यासाठी पुरेसा ठरतो. कंपनीतील पायाभूत सुविधा, तेथील माहितीचा साठा यांचे नुकसान अशा हल्ल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर होते. सायबर सुरक्षा टिकवून ठेवण्यासाठीचा खर्च अनेकदा अशा लघु आणि मध्यम आकाराच्या व्यवसायांना परवडत नसल्याने त्यांना लक्ष्य करण्याचे प्रमाण अलीकडच्या काळात वाढू लागलेले आहे. अलीकडेच झालेल्या एका संशोधनानुसार, साधारणपणे वर्षभरात जितके सायबर हल्ले केले जातात त्यापैकी ४१ टक्के हल्ले हे लघु व मध्यम आकाराच्या व्यवसायांनाच लक्ष्य करून त्यांच्यावर केले जातात.

‘वर्ल्ड सायबर क्राइम इंडेक्स’नुसार, जगभरात सर्वाधिक सायबर हल्ले होतात ते रशियामध्ये. संघटित गुन्हेगारी, इतर अनेक देशांशी असणारे शत्रुत्व, प्रभावी कायदेशीर अंमलबजावणीचा अभाव अशा अनेक कारणांमुळे रशिया या सायबर हल्ल्यांपायी हैराण झालेला आहे. त्या खालोखाल उत्तर कोरिया, युक्रेन, अमेरिका, चीन, रोमानिया, ब्राझील आणि भारत या देशांचा समावेश आहे. २०२४ साली सर्वाधिक सायबर हल्ले झेलावे लागले ते पोलंडला. या देशातील Cyberspace Defense Force या संस्थेने जाहीर केलेल्या माहितीनुसार, २०२४ सालामध्ये दर आठवड्याला या देशावर एक हजार सायबर हल्ले केले जात होते.

सायबर हल्ल्यांचे प्रमुख प्रकार सांगायचे झाले तर ते पुढीलप्रमाणे आहेत :

**मालवेअर (Malware) :** कोणत्याही प्रकारच्या हानिकारक किंवा नुकसान घडवून आणणाऱ्या संगणकीय आज्ञावलीला ‘मालवेअर’ असे सर्वसाधारण नाव दिले. सध्याच्या काळात सायबर सुरक्षेमध्ये सर्वाधिक धोका ‘मालवेअर’पासून आहे. आजमितीस १.२ अब्ज इतक्या प्रचंड संख्येने ‘मालवेअर’ आज्ञावली अस्तित्वात आहेत, अशी आकडेवारी उपलब्ध आहे. यातून संगणक प्रणालीचे मोठे नुकसान होऊ शकते किंवा सायबर गुन्हेगारांनाही यात मदत मिळू शकते. ‘मालवेअर’ आज्ञावलीच्या माध्यमातून ‘मोबाइल’, संगणक किंवा अंकीय प्रणाली बिघडवल्या जातात, त्यांचे नुकसान घडवून आणले जाते किंवा त्यांतील माहिती परस्पर चोरली जाते. म्हणूनच अशा धोकादायक ‘मालवेअर’ आज्ञावलींचा शोध घेणे आणि त्यापासून होणारे नुकसान रोखणे गरजेचे ठरते. ‘मालवेअर’मध्ये विषाणू (Virus) हा प्रकार सर्वांत धोकादायक असतो. संगणकातील ‘फाइल्स’मध्ये हा विषाणू प्रवेश करतो. संगणकातील ती ‘फाइल’ उघडताच हा विषाणू सक्रीय होतो आणि इतर ‘फाइल्स’मध्ये संक्रमित होतो. त्यामुळे अनेक प्रकारची महत्त्वाची माहिती नष्ट किंवा खराब होऊ शकते. ‘वॉर्म’ (Worm) हा ‘मालवेअर’मधील असाच एक धोकादायक प्रकार आहे. हा घातक प्रकार स्वत:च स्वत:ची प्रत तयार करून ‘नेटवर्क’द्वारे वेगाने पसरतो. हा ‘मालवेअर’ वापरकर्त्याच्या हस्तक्षेपाशिवायसुद्धा पसरत जातो. ‘ट्रोजन हॉर्स’ (Trojan Horse) हा थोडासा फसवणारा ‘मालवेअर’ आहे. स्वत:ची उपयुक्तता तो वरकरणी भासवतो. पण संगणकात किंवा ‘मोबाइल’वर समाविष्ट करून घेतल्यानंतर मात्र तो मोठ्या प्रमाणावर नुकसान करतो. माहिती चोरण्यासाठी किंवा त्या माहितीपर्यंत पोहोचण्यासाठी या ‘ट्रोजन हॉर्स’चा वापर केला जातो. ‘स्पायवेअर’ (Spyware) हे नावाप्रमाणेच वापरकर्त्यावर लक्ष ठेवून असते आणि ते त्याची गोपनीय माहिती

चोरण्याचा प्रयत्न करते. बनावट संकेतस्थळे, 'ई-मेल'द्वारे येणाऱ्या 'लिंक्स', बनावट आज्ञावली संगणकावर किंवा 'मोबाइल'मध्ये घेताना, हे 'मालवेअर' हल्ले करतात.

**रॅन्समवेअर (Ransomware) :** ही 'मालवेअर'ची पुढची पायरी असते. आपला माहितीचा साठा आणि संगणकातील महत्त्वाच्या 'फाइल्स' याद्वारे कुलुपबंद केल्या जातात आणि ते उघडण्यासाठी खंडणीची मागणी केली जाते. व्यावसायिकांच्या दृष्टीने हा सर्वांत खर्चिक असा हल्ला मानला जातो. २०२३ सालापासून अशा 'रॅन्समवेअर' प्रकारातील हल्ल्यांमध्ये तब्बल ६७ टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते आहे. २०१७ साली WannaCry नावाच्या एका 'रॅन्समवेअर'चा वापर करून १५० हून अधिक देशांमध्ये लाखो संगणकांवर हल्ला करण्यात आला होता. Petya/NotPetya नावाच्या एका 'रॅन्समवेअर'मुळे जगभरातील मोठमोठ्या कंपन्यांचे संगणक ठप्प झालेले होते. उद्योगसंस्थांना लक्ष्य करणाऱ्या REvil, LockBit, Conti या आधुनिक काळातील टोळ्या आहेत. उद्योगसंस्थांना लुबाडण्याचे काम त्या सातत्याने करीत असतात.

**फिशिंग अँड सोशल इंजिनिअरिंग :** विविध व्यवसायांवर केल्या जाणाऱ्या सायबर हल्ल्यांपैकी हा एक महत्त्वाचा प्रकार आहे. या प्रकारामध्ये सायबर गुन्हेगार जिथून माहिती चोरायची आहे त्या ठिकाणी काम करणाऱ्या लोकांचा विश्वास संपादन करतात आणि शिताफीने अथवा षड्यंत्र रचून हवी ती गोपनीय माहिती मिळवतात. त्यामुळे हा प्रकार अतिशय धोकादायक समजला जातो. 'फिशिंग' (Phishing) या सायबर हल्ल्यामध्ये ज्या कंपनीचे नुकसान घडवून आणायचे आहे तिची हुबेहूब नकली प्रतिकृती केली जाते आणि तिच्याशी संलग्न असणाऱ्या कंपन्या, त्यांचे ग्राहक, कंपनीतील वरिष्ठ अधिकारी, बँका यांना बनावट संदेश पाठवून त्यांच्याकडून परवलीचा शब्द (पासवर्ड), बँकेचे इतर तपशील अथवा अन्य संवेदनशील माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. २०२३ सालासाठीच्या उपलब्ध आकडेवारीनुसार, अशा 'फिशिंग' सायबर हल्ल्यांमध्ये गेल्या पाच वर्षांत ५७ टक्क्यांहून अधिक वाढ झाली असल्याचे समोर आले आहे. यात प्रामुख्याने आर्थिक उद्योगांना लक्ष्य करण्यात येत आहे.

**Distributed Denial of Service Attacks (DDoS) :** विविध प्रकारच्या सायबर हल्ल्यांमध्ये Distributed Denial of Service Attacks (DDoS) या प्रकारातील सायबर हल्ले अलीकडच्या काळातील सर्वाधिक धोकादायक समजले जातात. उद्योग-व्यवसायांसाठी हे एक नवे संकट ठरू लागले आहे. या प्रकारचा हल्ला एका विशिष्ट पद्धतीने केला जातो. त्यामध्ये सायबर गुन्हेगार एखादा विशिष्ट

संगणक लक्ष्य करतात. त्यावर खूप मोठ्या प्रमाणावर संदेशांची देवाण-घेवाण करून त्या संगणकावरचा ताण अधिक वाढवला जातो. त्यामुळे सगळ्याचा आधार असणारी संगणकीय प्रणालीच ठप्प होण्याची वेळ येते. अशा वेळी त्या प्रणालीतील कच्चे दुवे ओळखून त्यावर हल्ला केला जातो आणि त्यात बिघाड निर्माण करायचा प्रयत्न केला जातो. अशा परिस्थितीत 'इंटरनेट' सेवा थांबते किंवा तिच्यात बिघाड होतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होऊ शकते. 'ऑनलाइन' व्यवसाय किंवा बँकिंग सेवांमध्ये या पायी अडचणी येऊ शकतात. अलीकडच्या काळात Distributed Denial of Service Attacks (DDoS) हल्ल्यांचे प्रमाण आणि त्यातील गुंतागुंत वाढत चालली आहे. २०२३-२०२४ या गेल्या दोन वर्षांत Distributed Denial of Service Attacks (DDoS) या प्रकारातील हल्ल्यांच्या आठ लाखांहून अधिक घटना जगभरात नोंदवल्या गेल्या आहेत.

सायबर हल्ल्यांचे धोके सध्याच्या काळात वाढू लागलेले आहेत. त्यामुळे त्यांना रोखणारी यंत्रणादेखील तितकीच सक्षम बनवणे ही आजच्या काळाची गरज बनलेली आहे. आजमितीला भारत हा अंकीय विश्वातील एक प्रमुख देश समजला जातो. शासनव्यवस्थेपासून ते उद्योगविश्वापर्यंत आणि व्यवसायापासून ते संरक्षण व्यवस्थेपर्यंत सगळ्यांच पातळ्यांवर अनेकानेक अंकीय यंत्रणा आणि पद्धती भारताने अंगीकारलेल्या आहेत. त्यामुळे सीमेवरील लष्करी धोक्यांप्रमाणेच सायबर हल्ल्यांचा धोका हे आधुनिक काळातील नवे आव्हान ठरणार आहे. पाकिस्तान, चीन, तुर्कस्तान, बांगलादेश या देशांतून विविध प्रकारांनी सायबर हल्ले होत राहण्याची भीती भारताला आहे. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेलाही धोका निर्माण होऊ शकतो. याच्या जोडीला भारताच्या विरोधात कार्यरत असणाऱ्या दहशतवादी संघटनांचाही धोका मोठा आहे. Cyber Spying या प्रकारामध्ये भारतातील संवेदनशील आणि गोपनीय माहिती चोरली जाऊ शकते. त्यासाठी देशाचे सायबर सुरक्षा धोरण सक्षम असणे गरजेचे आहे. भारताची संगणक आपत्ती प्रतिसाद यंत्रणा प्रभावी असणे गरजेचे आहे. अद्ययावत अशा अंकीय प्रणालींचा अंगिकार करून कोणत्याही हल्ल्याला सामोरे जाण्यासाठी आणि होणारे संभाव्य हल्ले रोखण्यासाठी देश सक्षम असणे हीदेखील काळाची गरज आहे. पेहलगाम येथील दहशतवादी हलल्यानंतर भारतावर झालेल्या लक्षावधी सायबर हल्ल्यांनी या संकटाचे स्वरूप किती भयावह असू शकते याची जाणीव करून दिलेली आहे. त्यासाठी सशस्त्र संरक्षणदलाचे सामर्थ्य वाढवत असताना, दुसरीकडे, या अंकीय सामर्थ्याच्या दृढीकरणाकडे दुर्लक्ष करणे परवडणार नाही, अशी भूमिका सायबर तज्ज्ञ मांडत आहेत. ■■

# जिकडे-तिकडे

## बुडती ही शहरे... पाहवे ना डोळा!

चालू शतकातील सर्वांत गंभीर जागतिक संकटांपैकी एक म्हणजे हवामान बदलांचे संकट! त्याचे परिणाम जसे ग्रामीण भागांवर होत आहेत तसे त्याचे धोकादायक परिणाम शहरांवरही होत आहेत. लोकसंख्येची घनता, औद्योगिकीकरण, प्रदूषण आणि वाढते नागरीकरण या गोष्टींमुळे हवामान बदलांचे धोके आणखी वाढत चालले आहेत. या हवामानबदलांचे गंभीर स्वरूप अनेकानेक घटितांद्वारा व्यक्त होताना दिसते. पहिला प्रकार म्हणजे तापमानवाढ आणि उष्णतेच्या वाढत्या लाटा. जागतिक तापमानवाढीमुळे अनेक शहरांमध्ये उष्णतेच्या लाटा वाढत आहेत. भारतासह जगभरातील अनेक शहरांमध्ये उन्हाळ्यातील कमाल तापमान ४५ अंश सेल्सिअसच्याही वर गेलेले आहे. परिणामी, उष्माघाताच्या घटनांतही वाढ होऊ लागली आहे. जागतिक तापमानवाढीमुळे मुसळधार पाऊस आणि पूरपरिस्थिती यांची वारंवारता शहरी भागांमध्ये वाढत चालली आहे. या शिवाय, वायूप्रदूषण, पाणीटंचाई, अन्नपुरवठा व महागाई, आरोग्यसंकट अशा अनेकानेक समस्या वाढू लागल्या आहेत.

या सगळ्या पार्श्वभूमीवर, सिंगापूरमधील Nanyang Technological University या विद्यापीठाने किनारी प्रदेशांजवळ वसलेल्या जगभरातील अनेक शहरांचा अभ्यास केला असून त्या विषयीचा संशोधन प्रबंध सादर केला आहे. त्यातून अनेक महत्त्वाच्या बाबी पुढ्यात येत आहेत. आशिया, युरोप, अमेरिका आणि आफ्रिका या खंडांतील शहरांची या अभ्यासासाठी निवड करण्यात आलेली होती. जगभरातील ४८ शहरे अशी आहेत की ज्यांची नोंद या अहवालामध्ये 'बुडणारी शहरे' म्हणून करण्यात आलेली आहे. समुद्राची वाढत चाललेली पातळी या शहरांसाठी धोकादायक ठरत असल्याचे वास्तव समोर आले आहे. हवामानात होत असलेले बदल यासाठी प्रामुख्याने कारणीभूत असल्याचे या संशोधनात नमूद करण्यात आले आहे. भारतातील काही शहरेही त्यात आहेत. त्यामध्ये कोलकाता,

चेन्नई, मुंबई, सुरत या शहरांचा समावेश आहे. या संदर्भातील एक अहवाल नुकताच प्रदर्शित करण्यात आला असून जगभरात हा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आलेला आहे.

Nanyang Technological University या विद्यापीठाने केलेल्या अभ्यासामध्ये, धोक्याच्या तोंडावरील या ४८ शहरांमध्ये सध्या काय परिस्थिती आहे, गेल्या काही दशकांत तिथे काय बदल होत गेलेले आहेत आणि भविष्यात ही शहरे कशी व कशामुळे बुडू शकतात याचा आलेख अभ्यासपूर्ण रीतीने मांडण्यात आलेला आहे. त्यानुसार, २०१४ ते २०२० या कालावधीमध्ये चेन्नईमधील काही भूभाग दरवर्षी ०.०१ ते ३.७ सेंटीमीटर या वेगाने पाण्याखाली जातो आहे. सद्य:स्थितीत या भागामध्ये सुमारे दीड लाख लोक वास्तव्यास आहेत. चेन्नईतील थरामणी हे सर्वाधिक वेगाने पाण्याखाली जाणारे क्षेत्र आहे, असेदेखील या अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. अमेरिकी अवकाश संशोधन संस्थेने (NASA) दिलेल्या माहितीनुसार, २०२४ साली या भागातील समुद्राच्या पातळीत ०.५९ सेंटीमीटरने वाढ झालेली आहे. येथील जमीन ३.७ सेंटीमीटर अशा वेगाने पाण्याखाली जाते आहे. दुसरीकडे गुजरात येथील सूरत परिसरातील समुद्रकिनाऱ्यावरची जमीन ०.०१ ते ५.१ सेंटीमीटर अशा वेगाने पाण्याखाली गेली आहे. भूजलाचा प्रचंड उपसा, अतिवृष्टी आणि समुद्रपातळीत झालेली वाढ ही त्यामागची प्रमुख कारणे असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

भारताशिवाय जगभरातील जी अन्य शहरे भविष्यात पाण्याखाली जातील अशी भीती वर्तवली जाते आहे त्या शहरांमध्ये व्हिएतनाममधील Ho Chi Minh, बांगलादेशमधील चितगाव, इंडोनेशियामधील जकार्ता आणि चीनमधील Tianjin या शहरांचा समावेश आहे. इंडोनेशियामधील जकार्ताचा काही भाग तर दरवर्षी २५ सेंटीमीटरने खचत चालला आहे. हे धोक्याचे चिन्ह असल्याने जकार्तामधील नागरिकांना त्या भागामधून स्थलांतरित करण्याचा निर्णय घ्यावा लागलेला आहे. ही समस्या केवळ आशिया खंडापुरती मर्यादित नाही. अमेरिकेतील Houston, तुर्कस्तानमधील इस्तंबूल, नायजेरियातील Lagos, फिलिपिन्समधील मनिला या सारख्या शहरांचा समावेश या गटात आहे. चीनमधील सुमारे ४५ शहरे अशी आहेत की जी दरवर्षी किमान ३ मिलिमीटर अशा गतीने पाण्याखाली जात आहेत आणि आगामी काळात हे प्रमाण आणखी वाढत जाण्याचीही भीती आहे.

या आणि अशा शहरांमध्ये ही जी परिस्थिती उद्‌भवलेली आहे त्या मागील कारणांचा शोध घेत असताना भूगर्भातील पाण्याचा केला जाणारा उपसा हे त्यांमागील

एक प्रमुख कारण असल्याचे या संशोधनातून समोर आले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी आणि उद्योगधंद्यांसाठी हे पाणी मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. त्यामुळे भूजल पातळी खालावते आणि परिणामी जमीन खचू लागते. काही शहरांमध्ये हे प्रमाण वर्षाला ४० ते ४५ मिलिमीटर इतके आहे. ही अतिशय गंभीर बाब असून त्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे गरजेचे आहे अशी भूमिका संशोधकांनी मांडली आहे. भूगर्भात असणारे पाणी मोठ्या प्रमाणावर वापरले जाते आणि त्या तुलनेत पाणी जमिनीत मुरत नाही. त्यामुळे जे असंतुलन निर्माण होते त्यातून जमिनीचा स्तर घसरू लागतो. पाण्याच्या सुयोग्य नियोजनाचा अभाव, सांडपाण्याची व्यवस्था चांगली नसणे हेदेखील त्या मागचे एक प्रमुख कारण आहे.

या शिवाय, हिमनग वितळणे आणि त्यामुळे समुद्राची पातळी वाढणे हेसुद्धा एक प्रमुख असे कारण या धोक्याच्या मुळाशी आहे. जगभरातील अनेक शहरांच्याबाबतीत ही समस्या खडी होताना दिसते आहे. त्यामध्ये जगातील अनेक नामांकित अशा शहरांचादेखील समावेश आहे. पर्यावरणाची बेसुमार हानी आणि त्यामुळे होणारा ऱ्हाससुद्धा या सगळ्या बाबींच्या मुळाशी आहे. बेपर्वाईने होणारी वृक्षतोड, नव्याने वृक्षारोपण न होणे आणि वृक्ष संवर्धनाचा अभाव ही कारणेही या संदर्भात महत्त्वाची ठरतात. या सगळ्याचा परिणाम म्हणून अतिवृष्टी आणि वादळांचे प्रमाण वाढत जाते. त्याचे फटके अनेक शहरांना बसत आहेत. मोठ्या प्रमाणावर होणारे अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामे यांचा विळखा पडत असल्याने नदीकिनारी असणाऱ्या शहरांनाच अंतिमत: त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत. त्यामुळे येणाऱ्या काही वर्षांत जगभरातील अनेक प्रमुख शहरे पाण्याखाली गेलेली असतील अशी भीती वर्तवली जाते आहे.

या सगळ्यावर उपाययोजना काय हा जागतिक चिंतेचा विषय बनलेला आहे. त्या संदर्भात या क्षेत्रातील तज्ज्ञ अनेकविध उपापयोजना सुचविताना दिसतात. हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करणे हे त्यातील सर्वांत महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. त्या दृष्टीने पेट्रोल-डिझेलवर चालणाऱ्या वाहनांपेक्षा इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्याच्या दिशेने जागरुकता निर्माण केली जाते आहे. अभ्यासकांच्या मते जंगलतोड रोखून अधिकाधिक झाडे लावण्यावर भर देणे गरजेचे आहे. त्यासाठी जगभरात सगळीकडेच हरित वन क्षेत्र निर्माण करण्यावर भर दिला जाऊ लागलेला आहे. नगररचनाकारांच्या म्हणण्यानुसार, शहरांतील समस्येतून मार्ग काढण्यासाठी शहरांतील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. पावसाचे पाणी

साठवण्यासाठी 'रेन वॉटर हार्वेस्टिंग'सारखे प्रयोग यशस्वी रीतीने अवलंबले पाहिजेत. त्यांमुळे भूगर्भात पाणी मुरून भूगर्भातील पाण्याची पातळी शाबूत राहणे शक्य बनेल. नाल्यांची स्वच्छता करून त्यातील अडथळे दूर केले पाहिजेत. त्यांमुळे शहरे तुंबण्याचा धोका कमी होईल. शहरांमध्ये पूराची परिस्थिती कधीही निर्माण होऊ शकते हे लक्षात घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. भू-गर्भातील पाण्याचा अति उपसा थांबवणे हे सर्वांत मोठे आव्हान आहे. भूगर्भातील जलस्तर उंचावण्यासाठी पावसाचे पाणी जमिनीत अधिकाधिक मुरत जाण्याची व्यवस्था अशा शहरांत उभारली जाणे आवश्यक आहे. हवामानानुकूल शहरांची निर्मिती हेसुद्धा आजच्या काळातील एक प्रमुख आव्हान आहे. उंच बांधकामांना परवानगी देताना तारतम्य बाळगणे आणि जलाशयांची समृद्धी टिकवणे यावर लक्ष केंद्रित करावे लागेल, अशी भूमिका या क्षेत्रातील जाणकार मांडत आहेत. या संदर्भात जागतिक स्तरावर आणि सामूहिक स्तरावर एकत्रित प्रयत्न होण्याची गरज आता अधिक प्रकर्षाने अधोरेखित होते आहे. या धोक्याची नांदी म्हणून अलीकडेच सादर झालेला Nanyang Technological University या विद्यापीठाचा संशोधन अहवाल सगळ्यांनीच गांभीर्याने अभ्यासून त्यातील उपायांची काटेकोर अशी कार्यवाही केली जाणे त्या दृष्टीने अगत्याचे ठरते.


## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

## नियामक मंडळ

१. **प्रा. डॉ. एस. श्रीरामन** (अध्यक्ष)
२. **प्रा. डॉ. रवींद्र ढोलकिया**
३. **प्रा. डॉ. सुरिंदरसिंग जोधका**
४. **डॉ. रमानाथ झा**
५. **प्रा. डॉ. सुहास पळशीकर**
६. **प्रा. डॉ. अंजली राडकर**
७. **श्री. अभय टिळक** (मानद संचालक)

# उजळणी-१

## 'भागवत-धर्माची दीक्षा घ्या'

**भागवत-धर्म म्हणजे सर्वोदयच**

महाराष्ट्रातल्या संतांनी ज्या भूमीमध्ये भागवत-धर्माचा बोध दिला, त्या भूमीत सध्या आमची यात्रा चालली आहे. भागवत-धर्म म्हणजे ज्या धर्माची भगवंतांनी प्रेरणा दिली तो धर्म, भगवद्‌गीता आणि भागवत-ग्रंथरूपाने ज्याचा बोध दिला तो धर्म, आणि महाभागवतांनी व साधुसंतांनी जो आचरून जगापुढे ठेवला तो धर्म. आज तो भागवत-धर्म म्हणजे कोणता? माझे असे म्हणणे आहे की तोच हा 'सर्वोदय' आहे. 'भूतमात्रीं हरिवीण, न पाहेचि दुजेपण।' म्हणजे जी भूतमात्रे, जीवमूर्ती दिसतात, त्यांच्या ठिकाणी परमेश्वराला पाहणे. म्हणजे सर्व भूतमात्रांची सेवा करणे.

ज्या बाबतीत सर्वांचे एकमत होईल, त्याचाच कार्यक्रम करण्याची जी भागवत-धर्माची भूमिका आहे, तीच सर्वोदयाची भूमिका आहे आणि ती सबंध जीवनाला लागू करावयाची आहे. आजपर्यंत भागवत-धर्म जीवनाच्या सगळ्या क्षेत्रांत लागू केला नव्हता. कारण परिस्थिती अनुकूल नव्हती. पूर्वी समाजात कितीतरी भेद होते. राजे लोकांच्या हाती सारी सत्ता होती. तेव्हा हे सगळे भेद सहन करून निदान परमेश्वराच्या पुढे तरी सर्वांनी एक व्हावे, भूतदयेने सर्वांची काळजी घ्यावी, याचा आग्रह त्या वेळच्या लोकांनी राखला. ते राजसत्तेच्या भानगडीत पडले नाहीत. कारण त्यांना तशी सोय नव्हती. आता या विज्ञानाच्या युगात एक विचार फार थोड्या काळात सगळीकडे पसरू शकतो. पूर्वी भगवान बुद्ध पंचेचाळीस वर्षे बिहार, उत्तरप्रदेशाच्या भागात हिंडले, त्यांचा विचार त्यांच्या काळात त्या भागाच्या बाहेर पसरला नाही. कारण, त्या काळी तशी साधने उपलब्ध नव्हती. आता सात वर्षांच्या काळातच आमचा भूदान-ग्रामदानाचा विचार हिंदुस्थानातच नव्हे, तर जगात सगळीकडे पोचला. पूर्वी राज्य कसे असावे, समाजव्यवस्था कशी असावी, उद्योग- शेती-व्यापार इत्यादी कसे असावेत, याबाबत भागवत धर्म चूप असे. राजा परंपरेचा

असणे चांगले की निवडून दिलेला असणे चांगले, या बाबतीतही तो चूप असे. फक्त चांगला राजा असावा, एवढेच ते म्हणत असत. कारण, त्या वेळी सगळ्याच गोष्टी ते लोक बोलले असते, तर काम बिघडले असते आणि विचार कुंठित झाला असता. त्यामुळे ते धार्मिक बाबतीतच बोलत असत. पण आता भागवत-धर्माने राजकीय, सामाजिक वगैरे सर्व बाबतीत विचार मांडला पाहिजे. एवढे झाले, तर भागवत-धर्म म्हणजे सर्वोदयच होईल.

**संतांचा आधार**

सध्या आम्ही महाराष्ट्रातल्या संतांच्या भूमीत फिरत आहोत. तसे हिंदुस्थानात सगळीकडेच संत होऊन गेले, व सगळीकडेच मला त्यांचा जोर मिळाला. कर्नाटकात मी बसवेश्वराच्या भूमीत हिंडत होतो व तेथील लोकांना सांगत होतो की बसवेश्वरांनी जी शिकवण दिली तीच मी देत आहे. त्यांनी म्हटले आहे की शरीरपरिश्रम हाच कैलास आहे. मी लोकांना सांगत असे की प्रत्येकाने आपल्या शरीरपरिश्रमावर जगायचे हाच सर्वोदय. केरळात फिरत असताना मी तेथील लोकांना सांगत असे की येशू ख्रिस्ताने जी शिकवण दिली तीच मी सांगत आहे. त्याने म्हटले आहे की, 'जितके आणि जसे प्रेम तुम्ही स्वतःवर करता, तितके आणि तसे प्रेम तुम्ही शेजाऱ्यावर करा.' त्याने नुसते शेजाऱ्यावर प्रेम करा, एवढेच सांगितले नाही. हाच भागवत धर्म आहे. मी तेथील लोकांना सांगत असे की तुम्ही ख्रिस्ताच्या म्हणण्याप्रमाणे वागा. नंतर तमिळनाडमध्ये हिंडत असताना तेथील मुख्य सत्पुरुष तिरुवल्लुवर यांच्या कुरळ या ग्रंथात मला नेमके जे पाहिजे, तेच मिळाले. त्या ग्रंथात एक असे वाक्य आहे, की ''गावाची सगळी जमीन एक झाली पाहिजे. ज्याप्रमाणे गावची विहीर सार्वजनिक व सबंध गावाकरिता असते, त्याप्रमाणे भूमीचा अधिकार परमेश्वराने जो आपल्याकडे दिलेला आहे तो सर्वांच्यासाठी दिलेला आहे. भूमी म्हणजे गावची सार्वजनिक विहीर आहे असे समजून वागा.'' तिथे मी याच आधारावर बोलत असे. अशा रीतीने मी जिथे जातो, तिथे मला आधारच आधार मिळतात. आता इथे मी ज्ञानदेव, तुकाराम इत्यादी संतांच्या भूमीत हिंडत आहे. तेव्हा त्यांच्या नावाने बोलतो.

**सेवक कसे हवेत?**

इथे मी लोकांना सांगतो की तुम्ही घरोघर सर्वोदय - पात्र ठेवा. त्यातून जे धान्य येईल त्याच्या आधारावर सेवक वर्ग उभा करावयाचा आहे. सर्वोदय - पात्र ही भिक्षा नसून दीक्षा आहे. यात सर्वांची संमती मिळवावयाची आहे. तुम्ही म्हणाल की आम्ही सर्वोदय-पात्र तर ठेवू, पण सेवक कोठून आणावयाचे? त्यावर मी म्हणतो,

की पात्र ठेवणारे जे असतील, त्यांच्यातूनच सेवक मिळतील. सेवक म्हणून दुसरी माणसे कुठून स्वर्गातून का आणावयाची आहेत? तुम्ही तुमच्या गावात तांदूळ (सर्वोदय - पात्रातून) तयार केला, तसा माणूस तयार नाही का करणार? या ठिकाणी लाखो वारकरी असताना माणसांचा तुटवडा पडण्याचे काय कारण? कोणत्या-ना-कोणत्या वारीला जाणारे लोक देशात निदान दोन कोटी तरी असतील. आणि मी तर फक्त एक लाख सेवकांचीच मागणी करतो आहे.

आम्हाला गावोगावी निष्काम सेवा करणारे सेवक हवेत, पण ''अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझ्या विष्णुदासा भाविकांसी ।'' आमच्या हातून सेवा भरपूर होऊ दे, पण अहंतेचा वारा आम्हाला न लागू दे ! आम्ही सेवा करीत नाही, तो आमच्या हातून करवून घेतो. आम्ही तर त्याच्या हातांतील बाहुली आहोत. म्हणून खूप सेवा करा आणि उदंड आयुष्य घ्या. ''कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं । ही संतमंडळी सुखी असो ।'' राजस म्हणजे सुकुमार, राजासारखा. पतंजलीच्या सूत्रावर व्यासांनी लिहिलेल्या भाष्यात म्हटले आहे, ''अति सुकुमारः हि योगिनः।''योगी लोक अतिशय सुकुमार असतात. ज्याप्रमाणे सुकुमार डोळ्यांना यत्किंचितही कण सहन होत नाही, त्याप्रमाणे योग्यांना विकार, काम-क्रोध, यांचा लेशही सहन होत नाही. म्हणून माझ्या सुकुमार भक्तजनांना अहंतेचा वारा न लागो, अशी नामदेवांनी प्रार्थना केली. ''नामा म्हणे तयां असावें कल्याण। ज्यां मुखीं निधान पांडुरंग ।'' वारकऱ्यांमध्ये तुकारामांचे सुंदर तें ध्यान, उभे विटेवरी हा अभंग म्हटला जातो. त्याचप्रमाणे ज्ञानदेवाचा 'रूप पाहतां लोचनीं । सुख झालें वो साजणी' हाही म्हटला जातो. तशी आपली स्थिती झाली पाहिजे. समोर जे रूप दिसते ते पाहून सेवकाच्या नयनांना आनंद झाला पाहिजे. वर्ध्याला आम्ही महारोग्यांची सेवा करतो. महारोग्यांचे ते भयंकर विद्रूप चेहरे पाहणे माणसाला कठीणच वाटावे. एकदा मी तिथे गेलो असताना एकेक चेहरा पाहू लागलो, आणि मला 'रूप पाहतां लोचनीं' हे भजन आठवले. ही सारी भगवंताची रूपे आहेत असे जर वाटले नाही, तर आपल्या हातून काय कपाळाची सेवा होणार! म्हणून ज्यांची सेवा करायची, त्या सर्व परमेश्वराच्या मूर्ती समजा.

सर्वोदय-सेवक कोण, म्हणून मोजताना स्वतःला वगळून लोक मोजतात. अरे, जरा आपल्या छातीवर हात ठेवून मोजायला सुरुवात करा ना! ''को दशमः'' - दहावा कोण, हे ज्याला कळले, त्याला आत्मज्ञान झाले. आपल्याला धरून मोजदाद कराल, तर गडगंज सेवक मिळतील. सर्वोदय - पात्र स्थापित होण्याचा आणि सेवक मिळण्याचा असे दोन्ही क्षण एकच झाले पाहिजेत.

**खेड्यांतून सेवक मिळतील**

सेवक तुम्ही तुमच्याच गावातून काढला पाहिजे. सेवक कसा असावा याबाबत आम्ही गुणच सांगितले आहेत. नामदेवांनी म्हटल्याप्रमाणे तो वैष्णव, हरीचा दास, नम्र, ज्याच्या मनात अहंकार नाही, कोणी काहीही म्हटले तरी त्याच्या मनात विकल्प येत नाही, वाईट वाटून घेत नाही, असा असावा. अशी माणसे शहराच्या विद्वानांतून कमी मिळतील, परंतु खेड्यांतून लाखो मिळतील. पुष्कळांना वाटते, की खेड्यांतील माणसांना अक्कल नसते. पण खरी गोष्ट अशी आहे की जगामध्ये ज्यांनी धर्माचा झेंडा उभा केला, ते खेडोपाडीचेच लोक होते. येशू ख्रिस्त, महंमद पैगंबर, गौतमबुद्ध यांना खेडोपाडीची भाविक माणसेच मिळाली. तुकारामांचे चार हजार अभंग आज उपलब्ध आहेत. परंतु त्यांतला एक अभंग तुम्हाला कधी विसरता येणार नाही. कारण तो मरतेवेळचा अभंग आहे. शेवटचा निरोप लक्षात घेतलाच पाहिजे. ''कलिमध्ये दास तुका जातो लोकां सांगत। तार्किकांचा टाका संग, पांडुरंग स्मरा रे।'' तार्किकांच्या तर्कांत बळ नसते. त्यामुळे नुसत्या चिऱ्या, शाखा पडतात. तर्काने दृढनिश्चय होत नाही. 'हे करू, करू' असे वाटते. हेही बरे दिसते, तेही बरे दिसते. अनेक मार्ग पुढे येतात. कोणता घ्यावा ते ठरत नाही. याप्रमाणे तर्क माणसाला वीर्यहीन बनवितो. म्हणून तुम्हाला खेड्याखेड्यांतून माणसे मिळतील. त्यांना शिक्षण जरी कमी पडले तरी चालून जाईल. पण हृदयात प्रेम व भक्ती पाहिजे, आळस व अहंकार नको. त्यांना माहिती कमी असेल, तर ती देण्याची व्यवस्था करावी. शहरांतसुद्धा सज्जन असतात. पण तिथे तार्किक विद्या पसरली असल्यामुळे निश्चय होत नाही, डळमळीतपणा राहतो. म्हणून निश्चयपूर्वक काम करणारी माणसे खेड्यांतून जास्त मिळतील. ज्याप्रमाणे शिवाजी महाराजांना खेड्यांतून मावळे मिळाले, त्याचप्रमाणे आम्हालाही खेड्यांची सेवा करणारे खेड्यांतील लोक पाहिजेत. शहरांतील जे लोक खेड्यांत येतील, शिंगे मोडून वासरांत यावयास तयार असतील, त्यांना आम्ही घेऊ. शिंगे फुटलेली माणसे कामाला येत नाहीत. त्यांच्या बुद्धीमध्ये जरी गुण असले, तरी ते इकडे ढुशी मार, तिकडे ढुशी मार असे करतात. त्यामुळे त्रासच होतो. म्हणून खेड्यांत येताना त्यांनी आपली नागरबुद्धी ठेवावी, परंतु शिंगे मोडून खेड्यांची दीक्षा घेऊन यावे. 'शिवो भूत्वा शिवं यजेत्.' शंकराची पूजा करायला शंकर व्हावे लागते. दरिद्रनारायणाची सेवा करण्याकरिता त्याच्या हृदयाशी एकरूप व्हावे लागते.

**नाचत–गात जा**

खेड्यांतील माणसे शिंगे फुटलेली नसतात. पण त्यांना माहिती नसते; ती पुरवावी. त्यांच्यात दारू असते, तिला जरा बत्ती लागली की ती पेटलीच समजावी.

खेड्यांतील लोकांना चांगली भजनेही शिकविली पाहिजेत. म्हणजे कुठे दंगा झाला की ते भजन गात तेथे जातील. बिहारमधल्या एका मोठ्या सभेत एकदा काही तरी साप की विंचू आल्याची बातमी पसरल्यामुळे लोक एकदम उठले व धावपळ, आरडाओरड करू लागले. ते पाहून मी अर्धा मिनिट मौन राखले व तुलसीदासांचे भजन सुरू केले. त्याबरोबर तमाम सारी सभा शांत झाली. मी जर त्या वेळी अवांतर काही व्याख्यान दिले असते, तर कोणी शांत झाले नसते. पण भजन म्हटल्यावर सारे चित्रवत् शांत झाले. नंतर मी त्यांना भजनाचा अर्थ सांगितला व मग व्याख्यान पुढे सुरू केले. तेव्हा भक्तिपूर्वक भजन गाइल्याने दंगा शांत होतो, हे मी आपल्या अनुभवाने सांगतो. भक्तीला जर संगीताची जोड मिळाली तर भक्ती आणि संगीत मिळून आम्ही ॲटम व हैड्रोजन बाँबला बेकार बनवू शकू. आज लोकांनी संगीतविद्येला संसाराची, कामक्रोधाची, नवरसांची दासी बनविले आहे. पण तिला भक्तीची जोड दिली म्हणजे पहा तिच्यात केवढी शक्ती येते ती ! नामदेवांनी म्हटले आहे, ''काळ देहासी आला खाऊं । आम्ही आनंदें नाचूं गाऊं''. काळ देहाला खायला आला आहे, तरी नामदेव म्हणतो की आम्ही नाचणार, गाणार. लोक म्हणतील, 'अरे भलत्याच वेळी काय गातोस ? ही तर अंथरुणावर पडण्याची, डॉक्टरकडून इंजेक्शन घेण्याची व रडण्याची वेळ आहे.' त्यावर नामदेव म्हणतो, ''कोणे वेळेस काय बा गाणें । हें तों भगवंता मी नेणें ।'' कोण्या वेळेस काय गायचे ते काही मला कळत नाही, मी तर सदाच नाचत गात असतो. गायचे जेवायच्या वेळी आणि मरायच्या वेळी असले रडायचे, हे काही मला कळत नाही. तुकारामही असेच म्हणतात, ''विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा । तुकया मुखा विठ्ठल ।'' ओरिसात मी आमच्या कार्यकर्त्यांना म्हटले होते की, 'तुमच्या गद्य व्याख्यानांनी का ग्रामदाने मिळणार आहेत? नाचा-गा म्हणजे ग्रामदाने मिळतील.' आपल्या सेवकांत प्रेम पाहिजे. लोकांना प्रेम समजते, अर्थशास्त्राची व्याख्याने नाहीत समजत. इथे भक्तीची भजने गाऊन दान मिळते. मी नेहमी सांगतो की सेवकाकरिता तीन गुण हवेत, 'अंतरी निर्मळ, वाचेचा रसाळ, पायाचा शाबूत'. हृदयात प्रेम हवे, वाणीत रसाळता हवी व पायात आळस नको. ज्ञानाच्या भलत्या अटी नका घालू. प्रेमाने हृदये भरलेली आहेत, असे सेवक मागा; म्हणजे या संतांच्या भूमीतून हजारो सेवक मिळतील व ते खूप काम करतील. ■■

*(संदर्भ : महाराष्ट्रात विनोबा : भूदान आंदोलनाच्या काळात १९५८ मध्ये महाराष्ट्रात केलेली भाषणे, संपादक - पराग चोळकर, साधना प्रकाशन, दुसरी आवृत्ती, २०२४, पृ. क्र. २७८-२८२)*

# उजळणी-२

## ‘ग्रामदान आणि सरकारी मदत’

ग्रामदानाचे काम हे अहिंसेचे काम असल्यामुळे ते शांतीनेच व्हायचे, परंतु हे विज्ञानयुग असल्यामुळे हे कार्य योग्य पद्धतीने, पण अत्यंत तीव्र गतीने व्हायला हवे. तुम्हाला हे विधान परस्परविरोधी वाटेल, पण ते तसे नाही. मला घाई नाही, पण विज्ञानाला घाई झाली आहे. आज जगाची परिस्थिती इतकी स्फोटक आहे की विश्व-युद्ध केव्हा सुरू होईल ते सांगता येत नाही. उद्या युद्ध सुरू झाले तर सारी पंचवार्षिक योजना पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे गडगडून पडेल. मग खेड्यांना कोण वाचविणार? स्वराज्यात लोक दुष्काळाने मेले तर ती किती नामुष्कीची गोष्ट होईल! म्हणूनच मला तळमळ लागली आहे. ग्रामदान हे डिफेन्स मेजर असे मी म्हटले होते आणि नेहरूंनी ते अक्षरशः मान्य केले. युद्धाच्या परिस्थितीत ग्रामदानच आपल्या खेड्यांना वाचवू शकेल. पं. नेहरूंनी नुकतेच एका व्याख्यानात सांगितले की, ‘‘केन्द्र आणि प्रांतिक सरकारे, कम्युनिटी प्रोजेक्ट, एक्स्टेन्शन सर्विसेस, हे सर्व खेड्यांच्या समस्या सोडवितील असे समजून खेड्यांतील लोकांनी त्यांच्यावर विसंबून राहू नये. त्यांनी आपल्या पायावर उभे राहून आपल्या समस्या सोडवाव्यात.’’

सरकारने खेड्यांना मदत करावयाची आहे. परंतु योजना मात्र खेड्यांतील लोकांनीच करावयाची आहे. आम्ही योजना करू, तीच खेड्यांत चालेल, असे म्हणणे म्हणजे मोठा अहंकार आहे. खेड्यांना अशी मदत देता कामा नये की ज्यायोगे ती अनाथ होऊन मदतच मागत राहतील. आज कम्युनिटी प्रोजेक्टमधे जी मदत दिली जाते त्यात अमुकच खेड्यांना मदत कां दिली याचे काही कारण नाही. अमुक एका मंत्र्याच्या वशिल्यामुळे अमुक एका ठिकाणी प्रोजेक्ट सुरू झाला असे लोक म्हणतात, व आमच्याकडे कां सुरू केला नाही म्हणून तक्रार करतात. म्हणजे लोकांना तक्रार करण्यापलीकडे काही कर्तव्यच उरत नाही. म्हणून सरकारी योजनेनुसार लोकांना मदत मिळाली तरी माझा जीव धडधडतो, व नाही मिळाली तरी धडधडतो. तेव्हा

खेड्यांतील लोकांना आपल्या इच्छेप्रमाणे भिन्न भिन्न प्रयोग करण्याचा अधिकार असावा हीच मुख्य काळजी घ्यावी. वरून आम्ही बिनचूक योजना करून सर्व खेड्यांवर लादण्यापेक्षा खेड्यांतील लोकांना चुकीचे प्रयोग करण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. गांधीजींनी स्वराज्याची व्याख्या करताना म्हटले होते की स्वराज्य म्हणजे चुका करण्याचा अधिकार. असे हे स्वराज्य खेड्यांना लाभू द्या. ग्रामस्वराज्य होऊ द्या. सरकारने खेड्यांना जी मदत करायची ती अशा कुशलतेने करावी की ती मदत पुढे काढून घेतली तरी हरकत नाही. ज्याप्रमाणे कमानी उभारण्याकरिता प्रथम आधार म्हणून काही विटा लागतात व मग कमान मजबूत झाल्यावर त्या विटा काढून टाकतात, त्याप्रमाणे सरकारी मदतीच्या विटा कमानीला टेका देण्यापुरत्याच असाव्या; व कमान पक्की झाल्यावर काढून टाकाव्यात.

निरनिराळ्या कामांमध्ये निरनिराळ्या पद्धतींनी प्रयोग होऊ शकतात. आम्ही कोणत्याही पद्धतीचा आग्रह धरीत नाही. सर्वोदयाचे कोणत्याही पद्धतीशी लग्न लागलेले नाही; त्याचे सत्य-अहिंसेशी लग्न लागलेले आहे. ग्रामरचनेच्या बाबतीत समाजवाद, साम्यवाद इत्यादी निरनिराळ्या विचारधारांनुसार निरनिराळे प्रयोग चालू शकतात. रोग्याला पद्धतीचा आग्रह नसतो. फक्त रोग बरा व्हावा एवढाच आग्रह असतो. परंतु निरनिराळे उपचार पद्धतीवाले मात्र आपापल्या पद्धतीचा आग्रह राखतात. आम्ही म्हणतो की खेड्यांत निरनिराळे प्रयोग चालू द्या. फक्त मुख्य वस्तू कायम ठेवा ती ही की गावात मालकी सर्वांची, सर्वांनी प्रेमाने रहायचे व सर्वांच्या समाधानाने जे होईल ते करायचे.

ग्रामदानानंतर असे करावे की तसे करावे, याविषयी मला प्रश्न विचारला गेला. मी जाहीरपणे उत्तर देतो की, कसेही करा, जसे सुचेल तसे करा, पण हे लवकरात लवकर करून दाखवा. ग्रामदानी गावे चांगली करून दाखविली तर तुम्ही फार मोठी मदत केली असे मानले जाईल.

■■

*(संदर्भ : महाराष्ट्रात विनोबा : भूदान आंदोलनाच्या काळात १९५८ मध्ये महाराष्ट्रात केलेली भाषणे, संपादक - पराग चोळकर, साधना प्रकाशन, दुसरी आवृत्ती, २०२४, पृ. क्र. १४७-१४९)*

# पुरवणी

## ‘नामदेवराय’नामक तत्त्वाचा रोचक परिचय

# पुरवणी

## ‘नामदेवराय’नामक तत्त्वाचा रोचक परिचय

अनुभूतीपूर्ण संतविभूतींनी निर्मिलेले काव्य आणि वरकड कविता या दोहोंच्या आस्वादनप्रक्रियेमध्ये एक अतिशय मूलभूत असा गुणात्मक फरक नांदत असतो. संतसाहित्याच्या वाचन-पठण-पारायणामध्ये रुची असणाऱ्या सश्रद्ध जिज्ञासूंना त्या फरकाची अतिशय नेमकी जाण असणे केवळ अगत्याचेच नव्हे तर अत्यावश्यक ठरते. कोणताही साहित्यप्रकार - मग ती कथा असो, कविता असो, कादंबरी असो अथवा नाटक असो - हा मूलत: असतो कलारूप अविष्कार. त्या साहित्य-कृतीचा जो कोणी निर्माता असतो त्याला त्याच्या जीवनप्रवासामध्ये आलेल्या व्यावहारिक अनुभवाला त्याने प्रदान केलेले कलात्मक रूप म्हणजे तो साहित्याविष्कार होय. रोकड्या, खडबडीत जीवनानुभवाला कलात्मक रंगरूप प्रदान करण्याच्या साहित्यकाराच्या अंगभूत क्षमतेलाच आपण म्हणतो ‘प्रतिभा’. म्हणजे, साहित्य-कृतीच्या माध्यमातून आपल्या पुढ्यात उमलत असते ते तिच्या निर्मात्याने अनुभवलेल्या प्रसंगाचे, भावनेचे अथवा दृश्याचे कलात्मक रूप. इथे एक रूपांतर अथवा अवस्थांतर बेमालूमपणे परंतु अटळपणे साकारलेले असते. विलक्षण तरल संवेदनशीलता लाभलेल्या त्या प्रतिभावंताला पराकोटीच्या तीव्र सघनतेने भिडलेल्या एखाद्या जीवनानुभवाचे साहित्य-कृतीच्या रूपाने कलानुभवात्मक प्रगटीकरण घडत असताना त्यांत मूळ अनुभवाचे काही अंशी अवस्थांतर हे अध्याहृतच असते. ते अपरिहार्य असते आणि अनिवार्यही. त्याची संभाव्य कारणे दोन. व्यवहारात आलेला अनुभवच, प्रसंगी, इतका भेदक, भीषण, असाधारण असतो की त्याला साहित्य-कृतीचे अंगडे-टोपडे लेववून समाजमानसापुढे तसेच्यातसे सादर करणे, बऱ्याच वेळा, संबंधित साहित्यिकाला अशक्य ठरते, अनुचित वाटते. लोकमानसाचा आणि सरासरी शिष्ट लोकाभिरुचीचा आदर राखत, संभावितपणाच्या अवघ्या मर्यादांचे पालन करत, मग, त्या ओबडधोबड अनुभवाला ‘सुसेव्य’ पेहराव चढवणे साहित्यकाराला भाग

पडते. रूपांतराची ही झाली पहिली परी. काही अनुभव असे व इतके अ-साधारण असतात की त्यांचे तितकेच सघन प्रत्ययकारी कलारूप प्रगट करण्यास परिचित शब्दसृष्टी शबल ठरते. कारण, त्या अनुभवाचे स्व-रूप अभिव्यक्त करण्यास भौतिकातील शब्दसंपदा तोकडी शाबीत होते. अशा वेळी, मग, त्या अनुभवाचे शक्य तितके नितळ प्रगटीकरण घडवून आणण्यास अधिकाधिक उपयुक्त व सक्षम ठरतील असे लौकिक शब्दसृष्टीतील द्रव्य वापरून मूळ अनुभवाचे कलारूप साकारण्याची तडजोड साहित्यकाराला स्वीकारावी लागते. रूपांतराची ही होय दुसरी परी.

या प्रक्रियेद्वारे साकारलेली संबंधित कलाकृती, एक आस्वादक या नात्याने, जेव्हा तुम्ही-आम्ही अनुभवतो तेव्हा ती कलाकृती आणि आस्वादक यांच्यादरम्यान एक नाते अंकुरते. त्या नात्याचा पोत आणि सघनता अवलंबून असते ती आस्वादक कितपत संवेदनशील व तरल आहे त्याच्यावर. व्यवहारातील ज्या रोकड्या अनुभवाचे कलात्मक रूप साहित्यनिर्मात्याने त्याच्या कृतीद्वारे प्रगट केलेले असते त्या मूळ अनुभवाशी तादात्म्य पावण्यात आस्वादक रसिक किती प्रमाणात यशस्वी होतो हे पुन्हा ठरते दोन घटकांवर. मूळ अनुभवाचे कलात्मक रूप साकारण्यासाठी साहित्य-कृतीच्या निर्मात्याने उपयोजिलेली भाषा व शब्दरचना कितपत प्रत्ययकारी आहे, हा ठरतो त्यांतील पहिला घटक. तर, साहित्यिकाच्या प्रत्ययकारी शब्दांद्वारे प्रगटलेले मूळ व्यावहारिक अनुभवाचे कलात्मक रूप अनुभूतीच्या पातळीवर 'आपलेसे' करून घेण्याची संवेदनशीलता व तरलता आस्वादक रसिकाच्या ठायी कितपत आहे, हा ठरतो त्यांतील दुसरा घटक. पहिल्या घटकादरम्यान कसोटी लागते ती साहित्यकाराची. तर, दुसऱ्या आघाडीवर परीक्षा होते ती आस्वादक रसिकाची. संतसाहित्याची निर्मिती आणि आस्वादप्रक्रिया अन्य साहित्यप्रकारांच्या निर्मिती व आस्वादप्रक्रियेपेक्षा गुणात्मकरीत्या भिन्न शाबीत होते ती या दोन्ही प्रांतांमध्ये. मराठीचे ज्येष्ठ व व्यासंगी प्राध्यापक-समीक्षक प्रा. भी. रा. जहागीरदार यांनी कमालीच्या हळुवार तलमतेने सिद्ध केलेल्या प्रस्तुत 'नामदेव दर्शना'चे अंतरंग आणि आगळेपण नीटपणे आकलन होण्यासाठी, संतनिर्मित साहित्याचे आगळेपण आणि त्याच्या आस्वादाची तितकीच आगळी परी यांचा परिचय करून घेणे केवळ अगत्याचे नव्हे तर अत्यावश्यक ठरते.

संतसाहित्याद्वारे प्रगट होणारे संतांचे अनुभवविश्व आणि त्या साहित्यवाणाची आस्वादकता यांसंदर्भात अतिशय सूक्ष्म, प्रगल्भ व तितकेच रसमय विश्लेषण मांडलेले

आहे प्रा. व. दि. कुलकर्णी यांनी. संतांनी निर्मिलेले साहित्य आणि अन्य साहित्य यांच्यातील फरक हा मुख्यत: त्या साहित्यवाणाद्वारे प्रगट होणाऱ्या अनुभवाच्या जातकुळीशी संबंधित असतो व आहे. संतांच्या अभंग-ओव्यांद्वारे प्रगट होणाऱ्या अनुभवाचे स्वरूपच केवळ नव्हे तर त्याची अभिव्यक्तीदेखील अन्य साहित्यप्रकारांपेक्षा गुणात्मकरीत्या अतिशय वेगळी ठरते. संतविभूती त्यांना आलेला जो अनुभव शब्दांच्या माध्यमातून प्रगट करतात तो अनुभवच मुळात अतींद्रिय स्वरूपाचा असतो. ज्या व्यावहारिक जगात संतविभूती दैनंदिन जीवन व्यतीत करत असतात त्या भौतिक जगाच्या पलीकडचा असतो तो अनुभव. तो अनुभव असतो पारलौकिकाचा. ही झाली पहिली बाब. दुसरे म्हणजे, विलक्षण प्रत्ययकारी शब्दांत संत त्या अनुभवाचे जे शब्दरूप प्रगट करतात ते, सरधोपट अर्थाने, मूळ अतींद्रिय अनुभवाचे रूपांतरित अथवा अवस्थांतरित असे कलात्मक रूप नसते. संत त्यांचा अनुभव थेट साकार करतात त्यांच्या ठायीच्या प्रातिभशक्तीच्या बळावर. त्यासाठी, संतविभूती व्यवहारातील शब्दांचेच घडवून आणतात सक्षमीकरण. संतांच्या ठायीची ती प्रातिभशक्ती भारित झालेली असते परतत्वस्पर्शाने. **वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व । रसिकत्वीं हि परतत्व । स्पर्शु जैसा,** असे ज्ञानदेव जे म्हणतात ते हेच व याच अर्थाने. लोकव्यवहारातील शब्दसंपदा एरवी प्रगटीकरण घडवून आणत असते लौकिक


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

अनुभवांचे. लोकभाषा व लोकभाषेतील शब्द हेच असते पारलौकिक अनुभवांचे आविष्करण घडवून आणण्यासाठी संतांना उपलब्ध असलेले मूलद्रव्य. मात्र, त्याच मूलद्रव्याला परतत्वस्पर्श घडवत संतविभूती, त्यांना आलेल्या अतींद्रिय अनुभवाचे वहन तितक्याच प्रत्ययकारीपणे साकारण्यासाठी, सक्षम बनवतात. **त्याकारणें मी बोलेन । बोलीं अरूपाचें रूप दावीन । अतींद्रिय परी भोगवींन । इंद्रियांकरवी,** ही ज्ञानदेवांची प्रतिज्ञा म्हणजे त्याच प्रक्रियेचा उद्गार होय.

आता, ज्या अतींद्रिय अनुभवाला संत परतत्वभारित लौकिक शब्दांचा साज चढवून ओवी अथवा अभंगांद्वारे प्रगट करतात तो मूळ अनुभवच अ-लौकिक कोटीतील असल्यामुळे त्याच्याशी जवळीक साधणे ही आस्वादकाच्या लेखी दुष्कर बाब ठरते. संतबोलांद्वारे उमलणाऱ्या अनुभवाशी तादात्म्य पावणे, ही तर फारच पुढची गोष्ट! आपल्या कोणाच्याच ही वस्तुस्थिती चटदिशी ध्यानात येत नाही. आपली अतिशय मोठी दिशाभूल अथवा फसगत होते ती नेमकी इथेच. संतांच्या शब्दकळेशी, काहीएक शब्दाभ्यासानंतर, परिचय झाला म्हणजे संत त्या शब्दनिधीद्वारे ज्या अनुभवाचे आविष्करण घडवत आहेत त्या अनुभवाशीदेखील आपली जवळीक झाली, असे आपण किंवा आपल्यापैकी बरेचजण समजतात. संतांच्या शब्दांची ओळख म्हणजेच संतांच्या अनुभवाशी भेट असे व इतके सोपे ते असते तर, **नव्हती हाततुके बोल । मूळ ओल अंतरिंची,** असे बजावण्याची वेळ तुकोबांवर येतीच ना! संतांच्या अंतरंग अनुभवाने परिमळलेल्या अंतरीच्या बोलांद्वारे जो त्यांचा अतींद्रिय अनुभव पाझरत राहतो त्याच्याशी गळाभेट घ्यायची तर आस्वादकाचे अंतरही संतांच्या अंत:करणासारखेच हवे. अगदी साधे व सरळ समीकरण आहे हे. अखंड केलेल्या नामोच्चारणामुळे आपल्या अंत:करणाची झालेली अवस्था, तुकोबाराय, **महामळें होतें मन जें गादलें । शुद्ध चोखाळलें स्फटिक जैसें,** अशा शब्दांत विदित करतात. असे स्फटिकासारखे अंत:करण असेल तर, संतबोलांद्वारे प्रगटणाऱ्या अनुभवाशी थेट भेट घेणे संतसाहित्याच्या आस्वादकाला शक्य बनेल. हे सोपे अजिबात नाही. संतांचे अनुभूतीपूर्ण बोल केवळ वाचायचे अथवा ऐकायचे म्हणले तरी त्यासाठी आपल्या अस्तित्वाची कोटी कशा प्रकारची असावयास हवी, याचे सूक्ष्म सूचन ज्ञानदेवांनी त्यांच्या गीताभाष्याच्या अगदी प्रारंभीच करून ठेवलेले आहे. संतबोलांच्या आस्वादकांना, एक प्रकारे, तो सावधगिरीचा इषाराच म्हणायचा. **अहो अर्जुनाचियें पांति । परिसणया योग्य होती । तिहीं कृपा करूनि संतीं । अवधान द्यावें,** हा होय ज्ञानदेव देत असलेला तो सावधगिरीचा इषारा. भक्तोत्तम अर्जुन

आणि भक्तवत्सल कृष्णतत्व यांचे जे व्यासकथित संभाषण मी आता प्राकृतामध्ये विदित करतो आहे, ते ऐकायचे असेल तर इच्छुक श्रोत्यांनी प्रथम, आपण अर्जुनाच्या पंगतीला बसण्यास पात्र आहोत अथवा नाही हे तपासावे, अशी विनंती ज्ञानोबाराय करतात. पाचही पांडवांमध्ये एकटा अर्जुन काय तो ऋजू मनाचा असल्यामुळे तोच कृष्णबोधाचा अधिकारी ठरला. त्यांमुळे, सव्यासाची अर्जुनाप्रमाणे ज्यांचे अंत:करण ऋजू आहे त्यांनी पूर्ण एकाग्रतेने कृष्णार्जुनांचा संवाद ऐकण्यास सिद्ध व्हावे, असे आहे ज्ञानदेवांचे आवाहन.

देव आणि भक्त यांचा संवाद श्रवण करण्यासाठी अथवा त्या संवादाचे अक्षररूप वाचण्यासाठी जी आंतरिक पूर्वतयारी आस्वादक वाचकांच्या अथवा श्रोत्यांच्या ठायी ज्ञानदेवांना अपेक्षित आहे अगदी तशीच अंत:करणशुचिता नामदेवरायांसारख्या देवस्वरूप संतांचे प्रांजळ बोल वाचण्यासाठी अनिवार्य ठरत असते, या अतिशय सूक्ष्म वास्तवाचे भान आपल्याला प्रकर्षाने आणून देणे हे प्रा. जहागीरदार यांच्या या ग्रंथाचे अ-साधारण वैशिष्ट्य होय. विठ्ठलभक्तीमध्ये अहर्निश रममाण झालेल्या आणि कमालीची अलवार, निरागस बालवृत्ती चिरंतन धारण केलेल्या 'नामदेव'नामक आर्त मनाचा उत्कट परिचय प्रा. जहागीरदार नामदेवरायांच्या बोलांद्वारे आपल्याला इथे घडवतात. 'नामदेवराय' या तत्वाचे अवघे अ-लौकिकत्व, अभंगांमध्ये प्रतिबिंबित होणाऱ्या त्यांच्या मनाचे तलमतर पापुद्रे हळुवारपणे उलगडत जिज्ञासू आस्वादकोत्सुकांच्या पुढ्यात मांडण्याचा प्रा. जहागीरदार यांचा हा प्रयास, संतचरित्रांचे व संतबोलांचे अंतरंग विशद करण्याच्या पठडीबद्ध चाकोरीपेक्षा अतिशय निराळा आहे. केवळ निराळाच नव्हे तर अवघडही. बागेतील वृक्षाला लगडलेल्या फळाफुलांवरून त्याची ओळख पटावी अथवा करून घ्यावी, तसेच हे आहे. संतबोलांच्या समीक्षेची ही रीत फार जोखमीने हाताळावी लागते. संतांच्या अभंगांतील शब्दांमध्ये प्रतिबिंबित होणारे त्यांच्या अंतरंगातील भावकल्लोळ टिपण्यास तितक्याच तरल संवेदनशीलतेची मुबलक पुंजी गाठीशी असावी लागते. संतविचारांशी आणि त्यांतल्यात्यांतही नामदेवरायांच्या बोलांशी उमरभर जपलेल्या श्रद्धावगुंठित विश्लेषक जिव्हाळ्याद्वारे प्रा. जहागीरदार यांनी तशी उदंड पुंजी आत्मीयतेने जोपासल्याच्या अनंत खुणांची पखरण या ग्रंथाच्या पानोपानी झालेली आहे.

नामदेवराय आणि त्यांचे अभंग हा प्रा. जहागीरदार यांच्या अतीव प्रेमपडिभाराचा प्रांत होय. प्रेमाच्या व्यक्तीबद्दल अथवा विषयाबद्दल समरसून काही सांगण्यास कोणी सरसावले की त्या बोलांना 'कथना'पेक्षाही 'गायना'चे अंगडे-टोपडे आपसूकच

चढते. आपण एखाद्याच्या दोषांचे 'कथन' करतो परंतु प्रिय व्यक्तीच्या गुणांचे मात्र 'गायन'च असते. नामदेवरायांचे व्यक्तिमत्व आणि त्यांचे शब्दवैभव यांचे प्रा. जहागीरदार यांनी मांडलेले अत्युत्कट रसाळ गायन म्हणजे प्रस्तुत ग्रंथराज. नामदेवरायांबद्दल इतक्या पराकोटीच्या आत्मीयतेने कोणी बोललेले अथवा लिहिलेले यापूर्वी आढळत नाही. प्रा. जहागीरदार हे मराठीचे प्राध्यापक व चिकित्सक समीक्षक असले तरी त्यांचा पिंड मुळात कवीचा आहे, याची प्रचिती या ग्रंथात आपल्याला ठायी ठायी येते. नामदेवरायांचे विचारविश्व आणि भावजगत प्रगट करण्यासाठी प्रा. जहागीरदार यांनी साधन जरी लिखित ग्रंथरूपाचे उपयोजिलेले असले तरी त्यांची लेखनशैली मात्र रसाळ प्रवचनकाराची आहे. त्यांमुळे, ग्रंथगत विवेचनाद्वारे नामदेवरायांच्या गाथ्यातील अभंगांचे अंगसौष्ठव आणि त्यांतून डोकवणारे नामदेवरायांचे अंतर्विश्व आपल्या पुढ्यात छापील शब्दांच्या माध्यमातून साकारत असले तरी, जणू काही प्रा. जहागीरदार आपल्यासमोर विराजमान होऊन अभंगांचे रसोद्ग्राही निरूपणच करत आहेत, असा आभास वाचनानुभवादरम्यान सतत होत राहतो. नामदेवरायांच्या अभंगगाथेचे आणि पर्यायाने नामदेवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध आयाम विश्लेषक शैलीत उलगडून दाखवत असताना, त्यांमुळेच, प्रा. जहागीरदार यांचे विवेचन अणुमात्रही कर्कश अथवा कोरडे बनत नाही. उलट, ''अरे नामदेवरायांच्या अंत:करणाचा आणि अनुभूतीपूर्ण वचनांचा हा पैलू आपल्याला आजवर भावलाच नव्हता'', असा जाणीववजा साक्षात्कार आपल्याला या ग्रंथाच्या अंतरंगात आपण आस्थेने शिरायला लागलो की पदोपदी प्रकर्षाने होऊ लागतो. केवळ इतकेच नाही तर, 'नामदेवराय' या तत्वाचे आपले आकलन किती वरवरचे, अपुरे व अप्रगल्भ आहे याची प्रचिती येऊन आपण खंतावतोदेखील. आता, याच्यातही अ-स्वाभाविक अथवा विस्मय वाटण्याजोगे काहीच नाही. 'नामदेवराय'नामक तरलतम मनाची त्यांच्या अभंगांद्वारे उमटणारी स्पंदने टिपण्यास निबर मनाने सरसावल्यानंतर नामदेवरायांशी आपली सलगी व्हावी तरी कशी!(?). नामदेवराय समजावून घेणे म्हणजे काय आणि नामदेवरायांशी नाते जोडण्याची परी कशी असावयास हवी, हे प्रा. जहागीरदार आपल्याला शिकवतात त्यांच्या या ग्रंथाद्वारे.

ग्रंथ आणि ग्रंथकार यांचा महिमा संयुक्तपणे वर्णन करण्याची एक मोठी मोहक लेखनरीत वारकरी संतपरंपरेमध्ये काही ठिकाणी आपल्याला आढळून येते. **ज्ञानराज माझी योग्यांची माउली,** असा प्रारंभ असणाऱ्या सुविख्यात अभंगात नामदेवरायांनी विलक्षण आत्मीयतेने गुंफले आहे 'ज्ञानदेवी'चे रूपवर्णन आणि ज्ञानदेवांचे कार्यकर्तृत्व.

**भाव अक्षराचे गाठीं,** असा पहिला चरण असणाऱ्या मधुर अभंगात जनाबाई गातात ज्ञानदेवांचे गुणगान आणि व्यक्त करतात 'ज्ञानेश्वरी'चे अक्षरवैशिष्ट्य. तर, **सुख अनुपम संतांचे चरणीं,** अशी सुरुवात करत चोखोबाराय त्यांच्या अभंगाद्वारे घडवतात ज्ञानदेवांचे शब्ददर्शन आणि प्रगट करतात 'ज्ञानेश्वरी'चे सामर्थ्य. प्रा. जहागीरदार यांचा हा बृहद्ग्रंथ त्या लेखनरीतीचे स्मरण घडविणारा आहे. नामदेवरायांचे त्यांच्या गाथेतील अभंगसंपदेद्वारे साकारणारे दर्शन कमालीच्या उत्कटतेने उलगडून मांडत असतानाच, प्रा. जहागीरदार, नामदेवरायांच्या गाथेचेही स्वरूपदर्शन आपल्याला घडवतात. विशेषत:, नामदेवरायांच्या गाथेचे व तिच्यात समाविष्ट असणाऱ्या अभंगांचे इतक्या तपशीलवार विवरण मांडत नामदेवरायांचे व्यक्तित्व व कर्तृत्व सादर करण्याचा हा अपूर्व उपक्रम होय. ग्रंथातील एकंदर १४ प्रकरणांमध्ये, अगदी सहज जरी मोजदाद केली तरी, नामदेवरायांच्या जवळपास ८६० पेक्षा अधिक अभंगांची उद्धृते विवरणादरम्यान अंतर्भूत आहेत. महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या नामदेवरायांच्या गाथेमध्ये नामदेवरायांचे मराठी भाषेमधील २१०७ अभंग नमूद आहेत तर, हिंदुस्थानी पदांची संख्या आहे २३५. म्हणजे, ढोबळ मानाने, नामदेवरायांच्या मराठी अभंगांपैकी जवळपास ४०-४१ टक्के अभंगांचे रसाळ विवरण-विश्लेषण प्रा. जहागीरदार यांनी ग्रंथगत विवेचनादरम्यान मांडलेले आहे. अभंगांची ही उद्धृतेदेखील वैशिष्ट्यपूर्ण आहेत. संबंधित अभंगाचा गाभा, त्याचे त्या ठिकाणचे प्रयोजन, त्यांतील शब्दकळेचे सौंदर्य, शब्दांमधून प्रगट होणारी नामदेवरायांची भावस्थिती... अशा विविधांगांचे मनोज्ञ व तल्लीनतेने केलेले नितांतसुंदर, रसग्रहणात्मक भाष्य आपल्याला तिथे अनुभवण्यास मिळते. ते वाचले की, ''अरे, जहागीरदारसरांनी नामदेवरायांचा सार्थ आणि स-भाष्य गाथा सिद्ध केला असता अथवा सिद्ध केला तर किती बहार येईल..,'' असा विचार मनामध्ये तीव्रतेने उचंबळून आल्याखेरीज राहात नाही.

वारकरी परंपरेतील संतांच्या अभंगांचे सार्थ गाथे आज सर्वत्र दिसतात. संतांची चरित्रेही विपुल प्रमाणावर सिद्ध झालेली आहेत. संतांच्या बोलांद्वारे त्यांचे व्यक्तिमत्वदर्शन घडविणारे ग्रंथही उपलब्ध होतात. परंतु, प्रा. जहागीरदार यांच्या प्रस्तुत ग्रंथाचे रूप-स्वरूप आगळेच आहे. त्याला कारणही तसेच दिसते. मुळात, या ग्रंथनिर्मितीमागील प्रा. जहागीरदार यांची प्रेरणाच आगळी-वेगळी आहे. ग्रंथामध्ये, अगदी प्रारंभालाच त्यांनी निरलसपणे ती नमूदही केलेली आहे. ती प्रेरणा आहे निखळ काव्यानंद मनमुराद उपभोगण्याची. प्रा. जहागीरदार यांची निखळ काव्यप्रेमी वृत्ती या निर्मितीच्या मुळाशी आहे. नामदेवराय आणि त्यांचे भावविभोर काव्य यांवर

प्रा. जहागीरदार यांचे नितांत प्रेम आहे. रसनिर्मिती हे काव्याचे आद्य लक्षण तर आनंदनिर्मिती हे त्याचे प्रयोजन. या दोहोंचा आकंठ आस्वाद नामदेवरायांच्या अभंगांद्वारे सेवन करण्याची असोशी त्यांच्या मनीमानसी अनेक वर्षांपासून रुजली असली पाहिजे, असा कयास, ग्रंथातील त्यांचे तन्मयतेने साकारलेले भाष्य व विवरण वाचले की आपल्याला सहज बांधता येतो. नामदेवरायांच्या वाणीचा मोहवून टाकणारा अवीट गोडवा आणि आपण उपभोगत असलेला काव्यरसानंद मुक्त हस्ताने सगळ्यांना वाटून टाकावा, ही प्रा. जहागीरदार यांची अनावर ऊर्मी ग्रंथरूपाने साकारलेली आहे. **सेवितो हा रस वाटितो आणिका,** या तुकोक्तीचे अधिष्ठान या निर्मितीला लाभलेले आहे. नामदेवरायांचे अनुपम्य विठ्ठलप्रेम, नामदेवरायांप्रती विठ्ठलाला वाटणारा अनन्यसाधारण असा जिव्हाळा, या दोहोंचे नामदेवरायांच्या अभंगांत उमटलेले विविध विभ्रम, नामदेवरायांचे विठ्ठलकेंद्री जीवन, त्यांतून निपजणारी व अभंगांच्या शब्दाशब्दांतून ओथंबणारी नामदेवरायांच्या व्यक्तिमत्वातील कोवळीक, तगमग, आर्तता, हट्ट, विरहव्यथा, प्रेमकलह आणि या सगळ्यांतून अंतिमत: प्रगटणारे 'नामदेव'नामक तरल, भावकोमल मनाचे अवघे विभ्रम साहित्यप्रेमींना आस्वाद्य बनविण्याच्या प्रबळ प्रेरणेद्वारे प्रस्तुत ग्रंथरूप साकारलेले आहे. इथे अग्रपूजा मांडलेली आहे ती काव्यानंदाच्या रसास्वादाची. त्यांमुळे, 'नामदेवरायांच्या आज आपल्या पुढ्यात असलेल्या गाथ्यातील यच्चयावत अभंग हे निरपवादपणे ज्ञानदेवसमकालीन आद्य नामदेवांचेच आहेत का?', 'गाथेतील प्रक्षेप नेमके कोणते?', 'प्रक्षेपांचे कर्ते कोण असावेत?', 'क्षेपक अभंग निवडून काढता येतील का...?', 'त्यांसाठी कोणते निकष वापरावेत...?', अशासारखे, काही चिकित्सक समीक्षकांनी व संतसाहित्याच्या संशोधकांनी उपस्थित केलेले मुद्दे, प्रा. जहागीरदारांच्या काव्यप्रेमी वृत्तीला भावत नाहीत. ज्या फुलाचे रंगरूप व सुगंध आपल्याला आवडतो त्याचा आनंद घ्यावा, तो वर्णावा, जमेल तर इतरांना वाटावा, ते फूल ज्या झाडाला आलेले आहे त्या झाडाची वनस्पतीशास्त्राच्या पठडीतून अवास्तव चिकित्सा करत बसू नये, ते झाड देशी आहे की विदेशी यांसारखी तर्कटे उत्पन्न करून फुलाच्या रंगसुगंधाद्वारे मिळणाऱ्या अतीव आनंदाला अकारण कसर का लावावी.. अशी व इतकी नितळ भूमिका, या संदर्भात, प्रा. जहागीरदार यांची आहे.

नामदेवरायांच्या गाथ्याचे जे रूप-स्वरूप आज आपल्या पुढ्यात आहे, त्याबाबत अनेक विद्वानांमध्ये प्रगाढ असमाधान नांदत आलेले आहे. काळाच्या ओघात, आद्य नामदेवरायांच्या गाथेमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रक्षेप होत आलेले आहेत, हे त्या

असमाधानाच्या मुळाशी असणाऱ्या अनेकानेक कारणांपैकी एक मुख्य कारण गणले जाते. परिणामी, 'नामदेवरायांचा अभंग गाथा' म्हणून आजमितीस जे अभंगसंचित आपल्या हाती येते त्यात, पंढरीरायाचे 'प्रेमभांडारी' म्हणून ज्यांचे वर्णन केले जाते त्या १३-१४व्या शतकातील आद्य नामदेवरायांचे अभंग नेमके कोणते आणि 'नामदेव' असे नाव असलेल्या अथवा 'नामदेव' या अभिधानाशी अथवा त्याच्या एखाद्या नामरूपाशी साधर्म्य असलेल्या उत्तरकालीन रचनाकारांची रचना कोणती, याचा काहीही पत्ता लागत नाही. मुळात, नामदेवरायांचा गाथा हाती घेतल्यानंतर पहिल्या प्रथम जाणवणारी बाब म्हणजे तिच्यातील अभंगांमध्ये गुंफलेली, प्रचलीत मराठीशी जवळचे नाते सांगणारी, शब्दरूपे व भाषेची जातकुळी. काळाच्या हिशेबानुसार ज्ञानोबाराय आणि नामदेवराय समकालीन. ज्ञानदेवांच्या सगळ्या रचनांमधील भाषेची जातकुळी आजच्या मराठीचे पूर्वरूप अगर पूर्वावतार गणल्या जाणाऱ्या प्राकृताशी नाळ जोडणारी. परंतु, त्याच ज्ञानदेवांचे अंतरंग सखे असणाऱ्या नामदेवरायांच्या अभंगांतील भाषेची जातकुळी मात्र प्रचलीत मराठीशी कमालीची सुसंवादी, हे कोडे कसे उलगडावे? ज्ञानदेवांची शब्दकळा आकळण्यासाठी शब्दकोशच घेऊन बसावे लागते आणि नामदेवरायांच्या गाथेचे सहज वाचन वाचनानंद सुलभपणे पदरात घालते, यामागील रहस्य काय? **तापत्रय अग्नीची जळतसे शेगडी। आहाळोनी कोरडी झाली काया,** असा आरंभ असणाऱ्या नामदेवरायांच्या एका अभंगाची, वानगीदाखल केवळ एक नमुना म्हणून, या संदर्भात इथे आठवण होते. साधारणपणे १८-१९व्या शतकापासून पुढे व्यवहारात राहिलेल्या मराठी भाषेच्या अंगापिंडाचा बऱ्यापैकी परिचय असणाऱ्या कोणाही वाचकाला नामदेवरायांच्या गाथेचे हृद्गत उलगडणे दुस्तर वाटत नाही. आद्य नामदेवरायांच्या प्रेमभरित शब्दांनी अंतर्बाह्य नटलेल्या अभंगांची गोडी उत्तरकालीन समाजव्यवहाराच्या जवळपास सगळ्यांच स्तरांतील आस्वादकांना खुणावत राहून त्यांच्या अभंगांचे अभिसरण विविध समाजघटकांत होत आल्याने त्या त्या स्तरातील भाषाव्यवहाराचे संस्कार नामदेवरायकृत अभंगांच्या मूळ शब्दरूपांवर होत आले असले पाहिजेत, हे एकच त्यांतल्या त्यांत तर्कनिष्ठ स्पष्टीकरण या संदर्भात पुढे करता येईल. विशेषत:, अभंगांच्या अथवा ओवीबद्ध ग्रंथांच्या मूळ संहितेच्या प्रती हाताने नकलून तयार करण्याची वहिवाट ज्या समाजव्यवहारात सर्वदूर रूढ व प्रस्थापित असते अशा समाजांत कोणत्याही ग्रंथाच्या नकलांमध्ये प्रक्षेप व पाठभेद यांचा आढळ अपरिहार्य व एका अर्थाने स्वाभाविक मानावा लागतो.

'नामदेव' अशी नाममुद्रा वागविणाऱ्या अथवा 'नामदेव' या नाममुद्रेशी साधर्म्य सांगणाऱ्या उत्तरकालीन रचनाकारांच्या रचनांचा अंतर्भाव याच प्रक्रियेद्वारे ज्ञानदेवांना समकालीन असणाऱ्या आद्य नामदेवरायांच्या अभंगगाथेमध्ये घडून आला असला पाहिजे, असे प्रमेय यावरून मांडता येईल अथवा मांडणे भाग पडते. नामदेवरायांच्या अभंगगाथेची विश्वासार्हता याच मुद्यावरून आजवर वारंवार प्रश्नांकित होत आलेली आहे अथवा केली गेलेली आहे. आद्य नामदेवरायांच्या गाथेतील अशा प्रक्षेपांपायी उद्विग्न होऊनच नामदेवरायांच्या गाथेची चिकित्सक संहिता साकारण्याच्या उपक्रमाकडे प्रा. मुकुंद कानडे आणि रा. शं. नगरकर ही संशोधकद्वयी बहुधा प्रवृत्त झाली असावी. नामदेवरायांच्या अभंगगाथेची शुद्धी – तिच्यातील संभाव्य प्रक्षेप व घुसखोरी निवडून काढत – साधण्यासाठी कानडे आणि नगरकर या उभयतांनी सिद्ध केलेल्या निकषांच्या सुक्तासूक्ततेची चर्चा या ठिकाणी प्रस्तुत तर नाहीच नाही, परंतु आवश्यकही नाही. परंतु, नामदेवरायांच्या आज आपल्या पुढ्यात असणाऱ्या गाथेतील संभाव्य प्रक्षेपांचे निश्चितीकरण त्यासाठी निर्धारित केलेल्या निकषांनिशी घडवून आणण्याच्या कानडे व नगरकरांच्या उपक्रमाबाबत प्रा. जहागीरदार यांना सलणारे प्रगाढ असमाधान त्यांच्या ग्रंथगत विवेचनादरम्यान प्रसंगोपात्त अनेक ठिकाणी प्रगट होते. नामदेवरायांचे अभंगसंचित हा आतड्याच्या अतीव जिव्हाळ्याचा प्रांत असूनही, कानडे व नगरकर यांनी आरंभलेल्या नामदेव गाथा शुद्धीकरण उपक्रमाबाबत कोणतेही सकारात्मक–नकारात्मक मतप्रदर्शन तीव्र शब्दांत व्यक्त करण्याच्या वाटेला प्रा. जहागीरदार जात नाहीत, इथेही त्यांचे वेगळेपण उठून दिसते. गाथा शुद्धीकरणासाठी उभय अभ्यासकांनी अवलंबलेल्या पद्धतीबद्दलची व त्यासाठी उपयोजिलेल्या निकषांबद्दलची आपली नापसंती व आक्षेपही प्रा. जहागीरदार, सौम्य शब्दांत, प्रसंगी स्वत:कडे लघुत्व घेत, प्रगट करतात. नामदेवरायांच्या गाथ्याची चिकित्सक आवृत्ती सिद्ध करण्याच्या उपक्रमासाठी कानडे व नगरकर या दोघांनी स्वीकारलेल्या पद्धतीच्या उपयोजनामध्ये आढळणाऱ्या विसंगतींवर अचूक बोट ठेवतानादेखील प्रा. जहागीरदार यांच्या टिप्पणीपर शब्दांना अणुमात्रही धार चढत नाही. परंतु, त्या निमित्ताने नामदेवरायांच्या गाथेतील (कथित) प्रक्षेपांबाबत आपले मत व्यक्त करत असताना प्रा. जहागीरदार यांनी त्या संदर्भात व्यक्त केलेली त्यांची भूमिका गाथेतील संभाव्य प्रक्षेपांकडे बघण्याची एक नवीनच दृष्टी आपल्याला प्रदान करते, हे मात्र नि:संशय.

'ज्ञानदेवी'च्या १५ व्या अध्यायातील एका ओवीची या संदर्भात इथे आठवण होते. ज्ञानदेवांनी तिथे दृष्टान्त दिलेला आहे सोन्याचा. दोन अलंकार वितळवून,

समजा, तिसरा नग घडवायचा असेल तर दोन्ही अलंकारांच्या निर्मितीमध्ये वापरलेल्या सोन्याचा कस परस्परांशी तुलनीय असणे अत्यावश्यक असते, हा व्यवहारातील साधा नियम होय. भक्त आणि भगवंत यांचे ऐक्य घडून येण्यासाठी अनिवार्य असणारी पूर्वअट विशद करण्यासाठी ज्ञानदेवांनी हा दाखला तिथे उपयोजिलेला आहे. समजा, साडेपंधरा कसाचे सोने वापरून एखादा अलंकार घडविलेला असेल तर त्याच्याशी ऐक्य साधण्यास किमान पंधरा कसाचे सोने वापरून घडविलेला जिन्नसच पात्र ठरतो वा ठरावा. साडेपंधरा कसाच्या सोन्यामध्ये जेमतेम सात-आठ कसाचे सोने मिसळून कसे जमावे? दोन्ही अलंकारांच्या जडणघडणीमध्ये वापरलेल्या सोन्याच्या शुद्धतेची पातळी समतुल्य तरी हवी की नको? अगदी याच न्यायाने, आद्य नामदेवरायांच्या गाथेमध्ये ज्या उत्तरकालीनांच्या रचनांचा अंतर्भाव अगदी बेमालूमपणे केला गेला त्या रचनाकारांच्या रचनांची आणि त्या रचनांना ज्या अनुभूतीचे अधिष्ठान लाभलेले आहे तिची जातकुळी नामदेवरायांच्या अनुभूतीस्तराशी समकक्ष आणि म्हणूनच सुसंवादी असावी हे स्वाभाविक नव्हे का, असे मोठे मार्मिक सूचन प्रा. जहागीरदार कमालीच्या नजाकतीने घडवतात. संतसाहित्यातील प्रक्षेपांकडे बघण्याचा हा अतिशय उमदा दृष्टिकोन होय. संतांच्या रचनांमध्ये काळाच्या ओघात समाविष्ट होत आलेल्या प्रक्षेपांची व्यवस्था लावण्यासंदर्भात प्रा. जहागीरदार प्रदान करत असलेली समीक्षेची ही उदार नजर, प्रक्षेपकारांचे व्यक्तित्व-कवित्व-चरित्र अधिक जिज्ञासेने प्रकाशमान करण्यासाठी आवश्यक ठरणाऱ्या पुढील संशोधनाची दिशा उजळण्यास प्रेरणा देणारी शाबीत होते.

नामदेवराय आणि त्यांची अभंगसृष्टी हा भावजिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे प्रा. जहागीरदार यांच्या अभ्यासकदृष्टीला चिकित्सेचे मुळापासून वावडेच आहे अथवा असावे, असाही ग्रह यांवरून कोणी करून घेऊ नये. प्रा. जहागीरदार यांच्या तरल काव्यरसग्रहणाला तितक्याच प्रगल्भ व विचक्षण संशोधकीय दृष्टीचे अस्तर किती सघनपणे लाभलेले आहे, याचे अनेक कवडसे आपल्याला त्यांच्या विवेचनादरम्यान गवसतात. वानगीदाखल त्याची मोजकीच उदाहरणे मांडण्याचा प्रयत्न इथे केलेला आहे. ज्ञानदेवादी भावंडांचे आद्य चरित्रकार म्हणजे नामदेवराय. ज्ञानदेवादिकांचे चरित्र गुंफणारी एकंदर तीन प्रकरणे नामदेवरायांच्या गाथेत आपल्याला सापडतात. 'आदि', 'तीर्थावळी' आणि 'समाधि'ही ती तीन प्रकरणे. यांपैकी, 'तीर्थावळी' आणि 'समाधि' या दोन प्रकरणांचे कर्तेपण ज्ञानदेवसमकालीन आद्य नामदेवरायांकडे सुपूर्त करण्याबाबत काही अभ्यासक साशंक आहेत. या दोन प्रकरणांचे

रचनाकार हे उत्तरकालीन असावेत, या दोन प्रकरणांमध्ये मुबलक प्रक्षेप आहेत, असे काही संशोधकांचे ठाम प्रतिपादन आहे. सर्वश्री कानडे व नगरकर हे दोघेही अभ्यासक याच गटातील. आपणच रचलेल्या अभंगांमध्ये काही ठिकाणी नामदेवराय स्वत:चा तृतीयपुरूषी एकवचनी निर्देश करतात, ही बाब कानडे व नगरकर यांना खटकते. 'स्वत:च निर्मिलेल्या अभंगामध्ये रचनाकार स्वत:चाच तृतीयपुरूषी एकवचनी निर्देश कसा करेल?', अशी शंका उपस्थित करत, या उभय अभ्यासकांनी ज्ञानदेवसमकालीन आद्य नामदेवरायांच्या गाथ्यातील काही अभंग 'आद्य नामदेवरायांचे अभंग' म्हणून स्वीकारण्याबाबत नकारात्मक भूमिका घेतलेली आहे. नामदेवरायांच्या गाथेमधील 'तीर्थावळी' या प्रकरणातील पहिलाच अभंग, उपरोक्त शंका उपस्थित करत, कानडे व नगरकर त्यांनी सिद्ध केलेल्या चिकित्सक गाथ्यात 'अस्वीकृत' ठरवितात. स्वरचित अभंगांमध्ये, प्रसंगोपात्त, स्वत:चा तृतीयपुरूषी एकवचनी निर्देश करणे हे नामदेवरायांच्या रचनाशैलीचेच एक सहज अंग कसे आहे, हे, प्रा. जहागीरदार यांनी त्यांच्या या संदर्भातील विवेचनादरम्यान सप्रमाण सादर केलेले आहे. परंतु, खरी गंमत पुढेच आहे. नामदेवरायांनी आपल्या अभंगात स्वत:चा तृतीयपुरूषी एकवचनी निर्देश केलेले गाथेतील अन्य काही प्रकरणांतील अभंग कानडे व नगरकर 'स्वीकृत' ठरवतात मात्र, 'तीर्थावळी' या प्रकरणातील पहिला अभंग नेमक्या त्याच कारणासाठी ते 'अस्वीकृत' या प्रकारात जमा करतात, या, त्या उभय अभ्यासकांच्या संशोधनपद्धतीमधील अंतर्गत विसंगतीवर प्रा. जहागीरदार यांनी मार्मिकपणे अचूक बोट ठेवलेले आहे. मुळात, 'तीर्थावळी' हे प्रकरण आद्य नामदेवरायांचे नाहीच, या मनाशी पक्क्या झालेल्या पूर्वग्रहाधिष्ठित अभ्यासदृष्टीपायी अगदी कसलेल्या अभ्यासकांनी अवलंबलेल्या संशोधनपद्धतीलादेखील विसंगतीचा उपसर्ग कसा पोहोचू शकतो हे अधोरेखित करण्यात प्रा. जहागीरदार यांच्या ठायीची मर्मज्ञ अध्ययनवृत्ती व संशोधननिष्ठा ठसठशीतपणे प्रगट होते. परंतु, प्रा. जहागीरदार केवळ इथे व एवढ्यावरच थांबत नाहीत. तर, 'तीर्थावळी'तील काही अभंगरचनांमध्ये उमटणारे नामदेवरायांच्या शब्दकळेचे वळण व त्यांनी तिथे योजलेली शब्दरूपे, ज्ञानदेवांनी त्यांच्या गीताटीकेमध्ये योजलेल्या शब्दरूपांशी किती व कसे साधर्म्य दर्शवितात हे सप्रमाण सिद्ध करत, 'तीर्थावळी'सारखे काही अभ्यासकांनी शंकित ठरविलेले प्रकरण आद्य नामदेवरायांचे असावे की नाही, हे जोखण्याची एक वस्तुनिष्ठ अशी भाषाशास्त्रीय दिशाही उजळून मांडणे, हे प्रा. जहागीरदार यांचे संशोधकीय आगळेपण होय. संतांच्या साहित्यविश्वातील तथाकथित प्रक्षेपांची शलाकापरीक्षा वस्तुनिष्ठ पद्धतीने

करण्याचे हे एक मोठे सक्षम नवसाधन अभ्यासकांना खचितच उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरेल व ठरावे.

प्रदीर्घ असे चांगले ८० वर्षांचे आयुर्मान लाभलेल्या नामदेवरायांनी त्यांच्या जीवनयात्रेतील किमान तीन दशके तरी उत्तर भारतामध्ये व्यतीत केली असावीत, असा कयास बांधता येतो. ज्ञानदेव समाधिस्थ झाले त्या वेळी नामदेवराय होते २६ वर्षांचे. तिथवरचा त्यांचा जीवनक्रम त्यांच्या अभंगांमध्ये उमटलेला दिसतो व जाणवतो. मात्र, त्या नंतरच्या जवळपास पाच दशकांचा नामदेवरायांचा जीवनप्रवास त्यांच्या अभंगांमध्ये प्रतिबिंबित होत नाही, हे प्रा. जहागीरदार यांचे निरीक्षण अतिशय नेमके आहे. नामदेवरायांचे उत्तर भारतातील आणि मुख्यत: पंजाब प्रांतातील दीर्घ वास्तव्य त्यांच्या रचनांमध्ये कोठे व कसे डोकवत नाही, असा, इतरांना सहज न सुचणारा आणि नामदेवरायांबद्दल लेखन करणाऱ्या आजवरील अभ्यासकांना न भावलेला प्रश्न मार्मिकपणे उपस्थित करून, नामदेवरायविषयक विचारविश्वामध्ये आजवर न प्रवेशलेल्या या सूक्ष्म पैलूबाबत चिंतनमंथनास प्रारंभ करणे, हा प्रा. जहागीरदार यांच्या विचक्षण संशोधनवृत्तीचा आणखी एक प्रगल्भ आयाम होय. 'गुरू ग्रंथसाहिबा'त समाविष्ट असलेल्या नामदेवरायांच्या रचनांवर मराठी भाषाशैलीचा प्रभाव ठळकपणे जाणवतो. परंतु, नामदेवरायांच्या आज उपलब्ध असणाऱ्या गाथ्यांमधील मराठी रचनांवर, उत्तर भारतात प्रदीर्घ काळ वास्तव्य करूनही, हिंदुस्थानी भाषेचा असर कसा व का दिसत नाही, हा प्रा. जहागीरदार यांनी उपस्थित केलेला प्रश्न विलक्षण मार्मिक आहे, यात वादच नाही. उत्तर भारतातील अथवा पंजाबातील वास्तव्यादरम्यान नामदेवरायांनी मराठी भाषेत तिथे अभंगरचना केलीच नाही का, तिथून परत महाराष्ट्रात आल्यानंतर त्यांनी साकारलेल्या मराठी भाषेतील रचनांमध्ये, तब्बल तीन ते साडेतीन दशके वास्तव्य केलेल्या प्रदेशातील भाषेच्या खुणा उमटू नयेत हे अ-साधारण वाटत नाही का, हे प्रा. जहागीरदार यांनी त्यांच्या ग्रंथगत विश्लेषणादरम्यान उपस्थित केलेले प्रश्न, नामदेवरायांच्या कार्यकर्तृत्वा-संदर्भातील आजवर अ-लक्षित राहिलेल्या शोधप्रांतांकडे आपले लक्ष वेधतात. ''पंजाबात मराठी लेखन नाही आणि जिथे २५-३० वर्षे काढली त्या प्रदेशातील भाषेचा आपल्या पंढरीत आल्यावर मराठी भाषेला स्पर्शही नाही'', हे प्रा. जहागीरदार यांचे या संदर्भातील निरीक्षण त्यांच्या ठायी मुरलेल्या डोळस व पायाळू समीक्षादृष्टीची पुरेपूर साक्ष पुरविते. आजवर अ-लक्षित राहिलेली ही वस्तुस्थिती प्रकाशमान केल्याबद्दल संतसाहित्यविषयक आणि मुख्यत: नामदेवरायविषयक संशोधनविश्वामध्ये

कार्यरत असलेले विद्यमान अभ्यासक व संशोधक प्रा. जहागीरदार यांचे चिरंतन ऋणाईतच राहतील.

नामदेवरायांच्या माध्यमातून वारकरी संप्रदाय आणि भागवत धर्म उत्तरेत पोहोचला, ही बाब अनेक अभ्यासकांनी आजवर विदित केलेली आहे. परंतु, नामदेवरायांनी भागवत धर्माचा उत्तर भारतात केवळ प्रसार केला एवढेच नाही तर भागवत धर्म तिथे नामदेवरायांनी प्रस्थापित केला, हे प्रा. जहागीरदार यांचे विवेचनदेखील सूक्ष्म व अपूर्वच आहे. नामदेवरायांचे सर्वस्व असणारे प्राणप्रिय जिवलग असे विठ्ठल दैवत 'बिठलु' होऊन, त्यांच्या उत्तर भारतातील भ्रमणाद्वारे, 'गुरूग्रंथसाहिबा'त अवतरले आणि त्याच्या माध्यमातून जगभरात पोहोचले, हे वास्तव, प्रस्तुत ग्रंथ हाताशी येईपर्यंत आपल्याला तितक्या प्रकर्षाने जाणवले-भावलेले नसते. नामदेवरायांची सुमारे २५० ते ३०० मंदिरे त्यांच्या शिष्यादिकांनी उत्तर भारतात ठायी ठायी निर्माण करावीत, उत्तर भारतातील एका मोठ्या समाजघटकाने 'नामदेव' हे अभिधान आपल्या अवघ्या जातीसाठी उदंड प्रेमादराने अंगीकारावे व ते आजवर नांदत राहावे ही सारी नामदेवरायांच्या 'आद्य'त्वाची, आपल्याला आजवर ठसठशीतपणे प्रतीत न झालेली प्रतीके, प्रथम दृष्टिपथात आणून मग अधोरेखित करणे हे प्रा. जहागीरदार यांच्या या ग्रंथातील 'नामदेव दर्शना'चे अपूर्वत्व होय.

नामदेवरायांच्या जीवनकालात त्यांनी केलेल्या दोन तीर्थयात्रांदरम्यान त्यांच्या उभ्या व्यक्तिमत्त्वात साकारलेले अतिशय मूलभूत असे गुणात्मक स्थित्यंतर स्पष्ट करत त्याचा अनुबंध नामदेवरायांमध्ये घडून आलेल्या आंतरिक उन्नयनाशी आणि त्यांतून उमललेल्या वैचारिक प्रगल्भतेशी जोडणे, हा प्रा. जहागीरदार यांच्या मर्मज्ञ संशोधनदृष्टीचा आणखी एक सुदृढ आयाम होय. नामदेवरायांनी पहिली तीर्थयात्रा केली ती ज्ञानदेवांसह आणि त्यांचा पंचप्राण असलेल्या विठ्ठलाची इच्छा पूर्ण करण्यासाठी. त्या देशांतरापायी घडणाऱ्या अनिवार्य विठ्ठलविरहाच्या कल्पनेमुळे कमालीचे कष्टी झालेले नामदेवराय आणि आपलेच अभिन्न अंग असणाऱ्या भक्तराज नामदेवरायांच्या वियोगापायी 'देव'त्व संपूर्णतया विसरलेला विठ्ठलदेव, नामदेवरायांच्या अभंगांद्वारे आपल्या पुढ्यात कमालीच्या चेतोहर स्वरूपात उमलतात. त्या अवघ्या अभंगांचे तितकेच रसमय, उदात्त, भावगर्भ, करूणार्द्र तलम विवेचन प्रा. जहागीरदार यांनी उत्कट तन्मयतेने सादर केलेले आहे. तर, ज्ञानदेव समाधिस्थ झाल्यानंतर नामदेवरायांनी निखळ स्वयंप्रेरणेने केलेल्या उत्तर भारतातील भ्रमंतीमागील संभाव्य प्रेरणांचे तीक्ष्ण विश्लेषक शैलीत प्रा. जहागीरदार यांनी मांडलेले विवेचन, भावना

आणि तर्कनिष्ठ चिकित्सा यांचे समधात संतुलन विचक्षण संशोधकाच्या ठायी असणे का व कसे अत्यावश्यक ठरते, या बाबीचे निरपवाद दर्शन आपल्याला घडवते. वयाच्या तिशीमध्ये प्रवेशलेले, चौदा माणसांच्या कुटुंबाचे प्रमुखपण निभावणारे नामदेवराय, ज्ञानदेवांच्या समाधीनंतर पुन्हा उत्तरेकडे प्रयाण करताना, पहिल्या तीर्थयात्रेच्या वेळी झाले होते तसे विठ्ठलविरहाच्या कल्पनेने विव्हळ-व्याकुळ झालेले दिसत नाहीत, हे प्रा. जहागीरदार यांचे, या पूर्वी कोणालाही न भावलेले व भिडलेले अचूक व मार्मिक असे आणखी एक निरीक्षण. नामदेवरायांच्या साधनेची परिपक्वता हे त्या स्थित्यंतरामागील संभाव्य कारण असेल का... पंढरीक्षेत्रामध्ये विराजमान असणाऱ्या एकदेशी 'विठ्ठलदेवा'चे सगुण-साकार रूप आणि विश्वरूपाने प्रगटणारे 'विठ्ठलतत्वा'चे विश्वात्मक रूप यांच्या अभिन्नत्वाची अनुभूती नामदेवरायांच्या अंत:करणात स्थिरावल्याचा तो प्रगल्भ परिपाक मानावयाचा का... अशा शक्यता सूचित करत, नामदेवरायांच्या आंतरिक विश्वामध्ये घडून आलेले सर्वंकष असे गतिमान परिवर्तन हळुवारपणे उलगडणे हे प्रा. जहागीरदार यांच्या 'नामदेवशोधा'चे आगळे बलस्थान ठरते. संतचरित्रांच्या सश्रद्ध परंतु चिकित्सक संशोधनाची अशी दृष्टी संतसाहित्यसृष्टीच्या स-भाव व्यासंगाखेरीज संभवत नाही व नसते.

नामदेवरायांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल अगदी जुजबी माहिती असणाऱ्यांनाही त्यांच्या जीवनक्रमातील दोन प्रसंग हटकून ठाऊक असतात. बालवयातील नामदेवरायांच्या निर्व्याज व निरागस हट्टापायी त्यांनी घरून आणलेला नैवेद्य प्रत्यक्ष विठ्ठलाने भक्षण करणे, हा झाला त्या दोहोंतील पहिला. तर, कुत्र्याचे रूप धारण करून पोळ्या पळविणाऱ्या विठ्ठलामागे, ''अरे, बिनातुपाच्या पोळ्या खाशील तर तुझे पोट दुखेल म्हणून हे तूप लावून त्या पोळ्या खा'', असे परोपरीने विनवत हाती तुपाची वाटी घेऊन नामदेवराय त्याच्या मागे धावले, हा होय दुसरा प्रसंग. वास्तविक पाहता, आदिबीज चैतन्याच्या साकारलेल्या विश्वात्मक प्रगटीकरणाचे सम्यक् भान, ज्ञानदेवप्रणीत शांभवाद्वयाच्या तत्वदर्शनाशी भागवत धर्मप्रणीत भक्तिदर्शनाच्या घडून आलेल्या संयोगाद्वारे अंतरी स्थिरावलेल्या अनुभूतीसंपन्न विभूतीची चर्या नामदेवरायांच्या जीवनयात्रेतील उभय प्रसंगांद्वारे समूर्त साकार होते. नामदेवरायांच्या व्यक्तिमत्त्वाची ही सघनता व सखोलता आजही किती यथार्थपणे आपल्याला आकळली आहे, याची शंकाच आहे. कारण, नामदेवरायांच्या बालहट्टापायी मूर्तीने नैवेद्य भक्षण करण्याच्या कथेतील अद्भुततेचे गारूड मनावर प्रगाढ आरुढल्याने, 'बालभक्त' ही नामदेवरायांची प्रतिमा आपल्या सबोध-अबोध मनात चिरंतन स्थिरावलेली आहे.

त्या प्रतिमेचे कैदी बनून नामदेवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे आकलन बालबुद्धीने करण्याच्या आपल्या खुजेपणापायी, 'नामदेव'नामक तत्वाच्या विशाल व प्रगल्भ दर्शनाला आपण कसे मुकतो आहोत याचे डोळस भान आणून देणे, ही प्रा. जहागीरदार यांच्या या अक्षरसंभाराची अनन्यसाधारण देणगी होय. तर, 'नामदेवराय' हे विभूतिमत्व सम्यक्पणे आकळण्यासाठी अनिवार्य अशी सघन-सखोल दृष्टी प्रदान करणे हे प्रा. जहागीरदार यांच्या अवघ्या अक्षरश्रमांचे ठरते अ-पूर्वत्व. त्यांना दंडवत घालायचे ते त्यासाठीच!

*(टीप : 'प्रकाशाचे गाणे', या प्रा. भी. रा. जहागीरदार यांनी सिद्ध केलेल्या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेचे परिष्कृत रूप).*

## ('अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील लेखांचे संदर्भसाहित्य)


- https://www3.ntu.edu.sg/CorpComms2/Releases/NR2022/NR_ 220920_ sinkingcities/Sea-level%20rise%20from% 20land%20 subsidence% 20in%20major%20coastal%20cities.pdf
- https://www.researchgate.net/publication/320272916_ Urban_ Liveability_of_South_Asian_Cities
- https://unfccc.int/ttclear/misc_/StaticFiles/gnwoerk_static/TEC_ tab_1_ archive/ 2de6396f99394f22b08671ee85e11edc/1a08b 7bfc55d 45469ddd0d38e8708eb3.pdf
- https://www.csis.org/programs/strategic-technologies-program/ significant-cyber-incidents
- https://economictimes.indiatimes.com/news/india/since-pahalgam-terror-attack-on-22nd-april-india-is-thwarting-nearly-30-40-cyber-attacks-daily/ articleshow/121064570.cms?from=mdr
- https://www.darkreading.com/cyberattacks-data-breaches/pahalgam-attack-hacktivists-unite-opindia
- Yang, Florence W. (2022), China's Rare-Earth Resource Nationalism : Learning from Japan's Experiences.
- Seah, Ryan and Joshi, Yogesh (2021), China's Rare Earth Dominance : Exploring Australia-India Partnership, ISAS Insights, No. 671 - 25 May 2021.
- Ezrati, Milton (2023), How Much Control Does China Have Over Rare Earth Elements?
- Vekasi, Kristin (2019), China's Control Of Rare Earth Metals.
- प्रकाशाचे गाणे, लेखक - प्रा. भी. रा. जहागीरदार, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, २०२४.

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

## OTHER PUBLICATIONS

*Marathi Monthly:*

*ARTHABODH-PATRIKĀ*,
(Subscription Rs. 100/- per year)

*Books and Booklets:*

1. *Bhāratāteel Lok-Sankhyā Wādhichā Prashna: Santati-Niyamanāchee Jaruree Wa Tyāteel Yash,*
   (The Problem of Population Growth in India: The Need for Family Planning and its Success) (in Marathi)
   by Kumudini Dandekar, Pp. 60, Rs. 30/-.

2. *Compulsory Primary Education - Opportunities and Challenges,* Second Edition,
   (in English and Marathi),
   by Jayakumar Anagol, Pp. 54 and 61, Rs. 30/-.

3. *Shodh Ghetay Tay Shikshan,*
   (To Searches is Education), (in Marathi),
   by Ramesh Panse, Pp. 67, Rs. 50/-.

4. *Kartā-Karvitā, Adhunik Mendu-Sanshodhan va Aple Jeevan,*
   by Ramesh Panse, Rajyashree Kshirsagar, Anita Belhekar-Deshmukh, Pp. 242, Rs. 350/-.

5. *Governance, Supervision and Market Discipline: Lessons from Enron*
   by Jayanth R. Varma, Pp. 87, Rs. 100/-.
   Reprint from (*Journal of Indian School of Political Economy,* Vol. XIV, No. 4, October-December 2002)

6. *Poverty in India,* (Reprint 2008), by V.M. Dandekar and N. Rath, Reprinted by Books for Change Bangalore, Pp. vi+140, Price Rs 200/-

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/- रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/- रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/- रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/- रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**

# वाचनीय पुस्तके

**महाराष्ट्रातील वास्तुकला : परंपरा आणि वाटचाल : खंड १ व २, संपादक – नरेन्द्र डेंगळे, सहाय्यक संपादक : मीनल सगरे, चेतन सहस्त्रबुद्धे आणि पुष्कर सोहोनी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०२४, मूल्य – खंड १ – रुपये १९६/–, खंड २– रुपये २११/–.**

आपल्या सांस्कृतिक परंपरेमध्ये ६४ कलांचा निर्देश केलेला आहे. वास्तुविद्या ही त्यांतीलच एक कला. वास्तुकलेचा अथवा वास्तुविद्येचा आपला संबंध मुख्यत: येतो तो घरबांधणी अगर घरखरेदी करतेवेळी. हा संबंध असतो निखळ उपयुक्ततावादी. प्रेक्षणीय वास्तू, ऐतिहासिक माहात्म्य लाभलेली वास्तुशिल्पे आपण कुतूहलाने न्याहाळतो खरे; पण त्यांतही खूप मोठा भाग असतो अचंब्याचा, कौतुकाचा आणि विस्मयाचा. परंतु, वास्तुनिर्मितीमधील विद्येचे आणि कलेचे अंग आपल्यापैकी बहुतेकांच्या आकलनकक्षेत बहुधा अभावानेच प्रवेशते. त्याला कारणही तसेच आहे. वास्तुनिर्मितीमध्ये विलक्षण संवेदनशीलतेने केला गेलेला अवकाशाचा (स्पेस), प्रकाशाचा, आकाराचा आणि रचनेचा सूक्ष्म विचार अवगाहन करण्यासाठी निकड असते ती तितक्याच तरल संवेदनशीलतेची. काहींना ती संवेदनशीलता उपजतच लाभते. तर, अनेकांना ती प्रयत्नपूर्वक हस्तगत करावी लागते. वास्तुकलेचे मर्म आकळण्यासाठी वास्तुमधील सौंदर्यतत्त्व प्रतीत होणारी नजरच हवी. वास्तू न्याहाळायची म्हणजे नेमके काय बघायचे, हेच मुळात प्रथम शिकावे लागते. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने विलक्षण देखणा असा हा द्विखंडात्मक ग्रंथप्रकल्प साकारून तशी नजर कमावण्याचे एक अतिशय मौलिक साधन उपलब्ध करून दिलेले आहे. वास्तुनिर्मिती आणि वास्तुविद्या हाच ज्यांच्या प्रदीर्घ व्यासंगाचा व अनुभवसिद्ध अध्ययन–अध्यापनाचा प्रांत राहिलेला आहे, अशा प्रगल्भ वास्तुविद्याकारांच्या तप:पूत विचारसाधनेद्वारे या उभय खंडांचे अंतरंग शब्दबद्ध झालेले आहे. अतिशय सुबक, उच्च दर्जाचे आणि ग्रंथगत विषयाच्या सौंदर्यवैभवाचे मोल जपणारे निर्मितीमूल्य लाभलेले हे दोन्ही खंड म्हणजे एक अ–साधारण ग्रंथलेणेच होय. निर्मितीमूल्याच्या तुलनेत अल्पस्वल्पच भासावे अशा खरेदीमूल्यास हा ग्रंथठेवा उपलब्ध करून देत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने तो सर्व स्तरांतील जिज्ञासू आस्वादकांना सहजसुलभ आस्वाद्य बनविलेला आहे.

**RNI Regn. No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model colony Post Office Pune,**
**On 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग-व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राकिय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे – ४११ ०३०. येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**